। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २४८ वा । मंगळवार दिनांक १६ डिसेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### धाराशिव येथे सोन्य-चांदीच्या दागिण्यासह रोख रकमेची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी विरभद्र भुजंगय्या स्वामी, वय ६९ वर्षे, रा. महात्मा गांधी नगर, मातृछाया निवास धाराशिव ता. जि. धाराशिव यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.०९.१२.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील कपाटातील १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व रोख रक्कम ६,००० असा एकुण५८,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-विरभद्र स्वामी यांनी दि.१३.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१ (१),३३१(४), ३०५(अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### स्प्रींकलर दोन सेट, पाईप, नौजल, लोखंडी पाईप चिमण्यासह चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी कैलास हनुमंत चोंदे, वय ३५ वर्षे, रा. शिवाजी नगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांचे व आकाश चोंदे यांचे कळंब शिवारातील शेत गट नं १४७ब २४ मधील जैन कंपनीचे स्प्रींकलर दोन सेट, पाईप १६ नौजल, १६ लोखंडी पाईप, चिमन्या १६ असे एकुण ३२,००० किंमतीचे दि.११.१२.२०२५ रोजी ०९.३० ते दि. १३.१२.२०२५ रोजी ०९.३० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-कैलास चोंदे यांनी दि.१३.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मारहाण करुन गंभीर जखमी

परंडा (प्रतिनिधी)- वय ३० वर्षे, सगजान शंकर मासाळ, वय ५० वर्षे, दिपाली राहुल मासाळ, वय २५ वर्षे, सर्व रा. मासाळ वस्ती भोत्रा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.१२.१२.२०२५ रोजी मासाळ वस्ती भोत्रा येथे फिर्यादी नामे-रेश्मा बिरुदेव मासाळ, वय २९ वर्षे, रा. मासाळ वस्ती भोत्रा ता. परंडा जि. धाराशिव यांची कुत्र्याने चप्पल घेवून गेल्याचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, लोखंडी कोयत्याने मारहाण करुन गंभीर जखमी केले. फिर्यादी व त्यांचे पती यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रेश्मा मासाळ यांनी दि.१२.१२.२०२५रोजी दिलेल्या वैद्यकीय जबाबावरुन पो ठाणे परंडा येथे भा.न्या. सं.कलम ११८(२), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) सह ४,२५ आर्म क्ट अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१२डिसेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ३९९ कारवाया करुन ३,११,००० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## कंपन्यात व बँकामध्ये अडकलेले पैसे ठेवीदारांना परत द्या – खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर




धाराशिव (प्रतिनिधी)- सामान्य नागरिकांनी मोठ्या कष्टाने, घाम गाळून आपल्या मुलांचे शिक्षण, लग्न आणि सुरक्षित भविष्य यासाठी जमा केलेल्या ठेवी चिटफंड व मल्टिस्टेट संस्थांनी बुडवल्याचा गंभीर मुद्दा संसदेच्या हिवाळी अधिवेशनात धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओम राजेनिंबाळकर यांनी लोकसभेत अत्यंत आक्रमक भूमिका घेत केंद्र सरकारला थेट जाब विचारला.

की पल्स इंडिया लिमिटेड, समृद्ध जीवन, सहारा इंडिया लिमिटेड, इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, गुरुप्रसाद इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांसारख्या चिटफंड कंपन्यांमध्ये तसेच ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, मासाहेब जिजाऊ मल्टीस्टेट क्रेडिट सोसायटी, राजस्थानी मल्टीस्टेट क्रेडिट सोसायटी, साईराम अर्बन बँक आणि भगवान बाबा मल्टीस्टेट यांसारख्या मल्टिस्टेट संस्थांमध्ये लाखो सामान्य नागरिकांचे पैसे अडकले आहेत. या कंपन्या व संस्थांनी आकर्षक परताव्याचे आमिष दाखवून शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला बचत गट, ज्येष्ठ नागरिक आणि मध्यमवर्गीय कुटुंबांकडून कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक उभी केली. मात्र मुदत संपल्यानंतर पैसे परत न देता अनेक संस्था बंद पडल्या, तर काहींचे संचालक फरार झाले आहेत. यामुळे हजारो कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले असून अनेक ठेवीदार आर्थिक, मानसिक आणि सामाजिक संकटात सापडले आहेत, ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. खासदार ओम राजेनिंबाळकर यांनी सरकारच्या उदासीन भूमिकेवर तीव्र टीका करत सांगितले की, ठेवीदार न्यायासाठी वणवण फिरत असताना सरकार केवळ कागदी चौकशी आणि आश्वासनांपुरतेच मर्यादित राहिले आहे. दोषींना संरक्षण दिले जात आहे का, असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे.

धाराशिवसह महाराष्ट्र व देशातील विविध भागात या चिटफंड व मल्टिस्टेट संस्थांमुळे मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाली असून शासनाने आतापर्यंत ठोस कृती न केल्यामुळे जनतेत प्रचंड असंतोष पसरला आहे.

या पार्श्वभूमीवर खासदार ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांनी केंद्र सरकारकडे ठोस भूमिका घेऊन दोषी कंपन्या व संस्थांची सर्व चल-अचल मालमत्ता त्वरित जप्त करावी जप्त मालमत्तेचा लिलाव करून ठेवीदारांचे पैसे परत मिळवून द्यावेत ठेवीदारांच्या भविष्यात अशा प्रकारच्या फसवणुका थांबवण्यासाठी मल्टिस्टेट व चिटफंड क्षेत्रावर कठोर नियंत्रण आणावे

ही केवळ आर्थिक फसवणूक नसून सामान्य नागरिकांच्या विश्वासाची लूट आहे. त्यामुळे सरकारने राजकीय इच्छाशक्ती दाखवून तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अशी ठाम भूमिका खासदार ओम राजेनिंबाळकर यांनी लोकसभेत मांडली.

## सेवा हाच खरा धर्म या ब्रीदवाक्यानुसार धाराशिव रोटरी क्लबचे जयपूर फूट मोजमाप शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- सेवा हाच खरा धर्म या ब्रीदवाक्याप्रमाणे रोटरी क्लब धाराशिव व रत्नानिधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या जयपूर फूट (कृत्रिम हात-पाय) मोजमाप शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दि. ९ व १० डिसेंबर २०२५ रोजी आयोजित या शिबिराचा एकूण ७० गरजू लाभार्थ्यांनी लाभ घेतला. या शिबिरासाठी धाराशिव जिल्ह्यासह उमरगा, लोहारा, कळंब, तुळजापूर, वाशी, बार्शी, उदगीर व लातूर येथून अपंग व गरजू लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरामध्ये अपघात किंवा आजारामुळे हात किंवा पाय गमावलेल्या नागरिकांचे आधुनिक जयपूर फूट व हातांचे मोजमाप करण्यात आले. शिबिरात मोजमाप केलेल्या लाभार्थ्यांना एक महिन्याच्या आत कृत्रिम हात व पायांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री. रणजित रणदिवे यांनी दिली.

या प्रसंगी रोटरी क्लबचे सचिव श्री. प्रदीप खामकर, तसेच रो. रविंद्र साळुंके, रो. पी. के. मुंडे, रो. मेघश्याम पाटील, रो. सुनील गर्जे व रो. इंद्रजीत आखाडे यांची उपस्थिती व सक्रिय सहभाग होता.

या उपक्रमामुळे अनेक दिव्यांग बांधवांना नवजीवनाची आशा मिळाल्याने उपस्थित लाभार्थ्यांनी रोटरी क्लब धाराशिव व रत्नानिधी चॅरिटेबल ट्रस्टच्या सेवाभावी कार्याचे मनापासून कौतुक केले.

## कळंब येथील लोकअदालतीमध्ये ५२२ प्रकरणे निकाली, तर ३८ लाख ५८ हजार २६२ रुपयांची तडजोड – श्री. आर. के. राजेभोसले यांची माहिती



कळंब (प्रतिनिधी)- राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण यांचे निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण उस्मानाबाद यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कळंब या ठिकाणी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील लोकअदालतीमध्ये एकुण पाच पॅनल तयार करण्यात आलेले होते. पॅनल क्रमांक एक साठी श्री. आर. के. राजेभोसले जिल्हा न्यायाधीश-१ कळंब यांनी पॅनल प्रमुख तर अॅड. ए.एन. गवळी यांनी पॅनल पंच म्हणून कामकाज पाहिले तर पॅनल क्रमांक २ साठी श्री. पी. आर. कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश व. स्तर कळंब यांनी पॅनल प्रमुख तर अॅड. श्रीमती ए. पी.कोठावळे यांनी पॅनल पंच म्हणून कामकाज पाहिले. पॅनल क्रमांक ३ साठी श्री. के. के. चौधरी, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कळंब यांनी पॅनल प्रमुख तर अॅड. श्रीमती यु.बी. चौधरी यांनी पॅनल पंच म्हणून कामकाज पाहिले. पॅनल क्रमांक ४ साठी श्री. एन. एम. रेड्डी, २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कळंब यांनी पॅनल प्रमुख तर अॅड. श्रीमती ए. डी. कांबळे यांनी पॅनल पंच म्हणून कामकाज पाहिले. तर पॅनल क्रमांक ५ साठी श्रीमती ए. डी. जाधव मॅडम, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कळंब यांनी पॅनल प्रमुख तर अॅड. श्रीमती पी. एस. कणसे यांनी पॅनल पंच म्हणून कामकाज पाहिले.

सदरील लोकअदालतीमध्ये पाच पॅनलकडील ठेवण्यात आलेल्या एकुण १२६ दिवाणी प्रकरणांपैकी २१ दिवाणी प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली. सदरील प्रकरणामध्ये मोटर अपघात विमा क्लेमच्या २ प्रकरणामध्ये रक्कम रुपये १०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख) तर रक्कम वसुलीबाबतच्या दरखास्तीच्या एकुण १ प्रकरणामध्ये २,०३,३५९/- (अक्षरी रुपये दोन लाख तीन हजार तीनशे एकोनसाठ) आणि इतर १८ दिवाणी प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली. तसेच विविध स्वरुपाच्या एकुण ७५ फौजदारी प्रकरणांपैकी कौटुंबिक हिंसाचार प्रकरणातील अपिलाच्या १ प्रकरणे मिटविण्यात आली, ज्यामध्ये रक्कम रुपये २,२०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख वीस हजार) इतक्या रकमेची तडजोड झाली व इतर १ फौजदारी प्रकरण मिटविण्यात आले. तर गुन्हा कबुलीच्या एकुण ७० प्रकरणांपैकी २२ प्रकरणामध्ये रक्कम रुपये १२,२००/- (अक्षरी रुपये बारा हजार दोनशे) इतकी दंडाची रक्कम वसुल करण्यात आली. त्याचप्रमाणे सदरील लोकअदालतीच्या दिवशी विविध बँका, ग्रामपंचायती, नगर परिषद, पतसंस्था अशा इतर कार्यालयांमार्फत एकुण १७७७ दाखलपूर्व (प्री-लिटीगेशन) प्रकरणे सादर करण्यात आलेली होती, त्यापैकी बँकेच्या एकुण १२ दाखलपूर्व (प्री-लिटीगेशन) प्रकरणामध्ये बँक यांचेमार्फत लोकअदालती दिवशी एकुण रक्कम रुपये १३,७९,१००/- (अक्षरी रुपये तेरा लाख एकोणऐंशी हजार एकशे) इतकी रक्कम वसुल करण्यात आली. त्याचप्रमाणे लोकअदालतीच्या अनुषंगाने नगर परिषद कळंब यांचे वतीने एकुण ३२ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये ६,६१,०००/- (अक्षरी रुपये सहा लाख एकसष्ठ हजार तीस) इतकी रक्कम नगर परिषद स्तरावर वसुल करण्यात आली. कळंब तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या एकुण ४३३ दाखलपूर्व (प्री-लिटीगेशन) प्रकरणांमध्ये संबंधित ग्रामपंचायतीमार्फत ग्रामपंचायत स्तरावर एकुण रक्कम रुपये ३,८२,६०३/- (अक्षरी रुपये तीन लाख ब्याऐंशी हजार सहाशे तीन) इतकी रक्कम लोकअदालतीच्या माध्यमातून वसुल करण्यात आल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश-१ कळंब श्री. आर. के. राजेभोसले यांनी दिली. राष्ट्रीय लोकअदालत सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विधीज्ञ मंडळातील सर्व विधीज्ञ, न्यायालयीन कर्मचारी तसेच पोलिस प्रशासन यांनी परिश्रम घेतले.

## उमरग्यात सराफाचे दुकान फोडल्याने भीती




उमरगा (प्रतिनिधी)- शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील एका सराफाच्या दुकानावर पाच चोरट्यांनी धाडसी दरोडा टाकून जवळपास साडेपाच लाखांचा ऐवज लंपास केल्याची घटना रविवारी (दि. १४) पहाटेच्या सुमारास घडली आहे. ही चोरी सीसीटीव्हीमध्ये दिसून आलेल्या चोरट्यांकडे शस्त्रे असल्याचे दिसून आल्याने नागरिकांत दहशतीचे वातावरण निर्माण झाली आहे.

मागील तीन चार पाच महिन्यांपासून शहरात चोरट्यांची टोळी सक्रिय झाली असून, आठवडी बाजारातील मोबाइल, दुचाकी चोरीसारख्या घटना वाढल्या आहेत. उमरगा बसस्थानक परिसरात चोरटे सक्रिय झाले असून, बसस्थानकातील लातूर पॉइंटवर वारंवार महिलांचे दागिने चोरी झाल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. एका घटनेत तर हातातील सोन्याची पाटली कापून घेतल्याची घटना घडली होती. बसस्थानकात चोरीच्या वारंवार होणाऱ्या घटना पाहता पोलिस कर्मचाऱ्यांची नेमणूक करूनही चोरीच्या घटना घडतात हे विशेष आहे. बसस्थानकामध्ये होणाऱ्या गर्दीचा फायदा घेत मागील काही दिवसांमध्ये पाकीट चोरी, दागिने, पर्स, खिशातून रक्कम पळवणे यासारख्या चोरीच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरटे सक्रिय झाले असताना पोलिसांकडून मात्र अद्यापही तपासात विशेष काही कार्य दाखवले जात नाही. उमरगा शहरात वारंवार चोरीच्या घटना वाढल्या असून, गेल्या काही दिवसांत शहर आणि परिसरात अनेक ठिकाणी घरफोड्या झाल्याने पोलिसांपुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

मागील सहा महिन्यांत वाढले प्रमाण

मागील सहा महिन्यांपासून चोरी व लुटमारीच्या घटना घडण्याचे प्रमाण वाढले आहे. ही बाब गंभीर आहे. चोरीच्या बऱ्याच लहान-मोठ्या घटना घडल्या आहेत. चोरीला गेलेला माल तपासात किती रिकव्हर झाला हे पण महत्त्वाचे आहे. शहरामध्ये एटीएममधून एका ग्राहकास एटीएम कार्डची अदलाबदल करून सव्वा लाख रुपये काढले होते. अशा घटना वारंवार घडत आहेत. पोलिसात तक्रार दाखल केल्यानंतर नेमके तपासात मात्र काहीही निष्पन्न होत नाही. यामुळे नागरिकांत तीव्र नाराजी आहे. वारंवार होणाऱ्या चोरीच्या घटनेने नागरिक मात्र चांगलेच वैतागले आहेत.

## दरोड्याची तयारीत आसणाऱ्यावर गुन्हा दाखल

ढोकी (प्रतिनिधी)- येथील पोलीस ठाणे अंतर्गत अशोक, वय ४० वर्षे, सुरेश, वय २९ वर्षे, विजय वय २२ वर्षे, बबीता वय ५५ वर्षे, नितीन , सचिन रा. खामकरवाडी ता. बार्शी जि. धाराशिव, ज्ञानेश्वर वय २० वर्षे, महादेव वय २४ वर्षे, दोघे रा. जागजी ता. जि. धाराशिव हे दि. १४.१२.२०२५ रोजी ढोकी पेट्रोल पंप चौकात लातुर ते बार्शी जाणारे रोडवर बार्शी कडे दरोड टाकण्याचे उद्देशाने एकत्र येवून दरोड्याचे तयारीनीशी होंडा कार, एक लोखंडी कत्ती, लोखंडी सतुर, दोन मार्तुल, वायर, कटर, कंपास बॉक्स, लोखंडी पाने, रिंग पाने, लोखंडी पक्कड, लोखंडी हातोडा, व्हील पाना, लोखंडी कत्ती, एम लोखंडी रॉड, विळा, लाल रंगाचे बॅग मिरची पावडर, काळ्या रंगाची टोपी, लाल काळ्या रंगाचे ५० फुट वायर असा एकुण ५,०५,७०४ किंमतीचे सामान कब्जात बाळगलेले ढोकी पोलीसांना मिळून आले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-बापुजी गोपाळराव पुरके, सफौ नेमणुक पोलीस ठाणे ढोकी यांनी दि.१४.१२.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३१०(४), ३१०(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## शासकीय कामात अडथळा निर्माण करणे

नळदुर्ग (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत शिवाजी व महेश दोघ रा. अणदुर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.१२.१२.२०२५ रोजी अणदुर येथे फिर्यादी नामे-सतिश भानुदासराव खंडके, वय ५३ वर्षे, रा. गोरोबा काका नगर सांजा रोड धाराशिव ता.जि. धाराशिव हे व रुपामाता अर्बन को. सोसायटी चे कर्मचारी हे मा.न्यायाधिश वरिष्ठ स्तर तुळजापूर आदेशाने विशेष दरखास्त क्र ८९६/२०२५ मधील प्रतिवादीचे घरातील जंगम वस्तु जप्त करण्यासाठी गेले असता नमुद आरोपीतांनी संगणमताने फिर्यादी हे शासकीय काम करीत असताना शिवीगाळ करुन धक्काबुक्की करुन जिवे मारण्याची धमकी देवून शाकीय कामात अडथळा निर्माण केला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सतिश खांडके यांनी दि.१२.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे नळदुर्ग येथे भा.न्या. सं.कलम १३२, ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन

बिहार सरकारमधील रस्ते बांधकाम, नगरविकास आणि गृहनिर्माण मंत्री नितीन नबीन यांची भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही घोषणा होईपर्यंत त्यांना याची कल्पनाही नव्हती. भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी आपली निवड होईल याचा स्वप्नातही त्यांनी विचार केला नव्हता. इतकी मोठी जबाबदारी मिळाल्यानंतर त्यावर सहसा विश्वास बसला नाही अशी प्रतिक्रिया नितीन नबीन यांनी दिली आहे. नितीन नबीन यांनी म्हटले की, हे फक्त भाजपात शक्य आहे. एका सर्वसामान्य कार्यकर्त्याला कार्यकारी अध्यक्षपदाची जबाबदारी दिली जाते. हे पत्रक जारी होण्याच्या एक दीड तास आधी ते कार्यकर्ता सन्मान सोहळ्यात होते. त्यात कुणालाही याची भनक नव्हती की सोहळ्यात कुणी पक्षाचा राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष बनणार आहे. कार्यकर्ता जमिनीवर काम करत असेल तर पक्षही त्यांना मोठी जबाबदारी देऊ शकतो हे या निर्णयातून दिसून येते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश वेगाने पुढे जात आहे. त्यात संघटना आणि कार्यकर्ता यांना मजबूत करण्यावर भर दिला जात आहे असे त्यांनी सांगितले. तसेच पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्व आणि संसदीय समितीने जो विश्वास माझ्यावर टाकला आहे तो १०० टक्के सार्थ ठरवण्याचा माझा प्रयत्न राहील. बूथपासून राष्ट्रीय स्तरावर संघटना मजबूत करणे आणि येत्या निवडणुकीत विजय निश्चित केला जाईल. वरिष्ठ नेतृत्वाच्या मार्गदर्शनात आणि कार्यकर्त्यांच्या बळावर प्रत्येक राज्यात पक्षाला ताकदवान केले जाईल. भाजपाने नेहमी सबका साथ, सबका विश्वास या मंत्रावर काम केले आहे. ज्याचा उद्देश समाजातील सर्व वर्गातील लोकांचा विकास व्हायला हवा. ही पक्षाची मुख्य विचारधारा बनली आहे असेही नितीन नबीन यांनी म्हटले. नितीन नबीन सध्या बिहार सरकारमधील रस्ते बांधकाम मंत्री आहेत. ते पाटण्याच्या बांकीपूर मतदारसंघातून चार वेळा आमदार झाले आहेत. कायस्थ समाजातून येणारे नबीन हे भाजपाचे ज्येष्ठ नेते नवीन किशोर सिन्हा यांचे पुत्र असून विद्यार्थी राजकारणापासून संघटनेतील विविध पदांपर्यंत त्यांनी प्रदीर्घ प्रवास केला आहे. नितीन नबीन यांनी मेहनती कार्यकर्ता अशी ओळख निर्माण केली आहे. ते युवा आणि कष्टाळू नेते असून, त्यांच्याकडे मोठा संघटनात्मक अनुभव आहे. बिहारमध्ये आमदार तसेच मंत्री म्हणून अनेक कार्यकाळासाठी त्यांचा विक्रम आहे. त्यांची ऊर्जा आणि समर्पण पक्षाला अधिक बळकट करेल असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्यांचे कौतुक केले आहे. बिहारमध्ये नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत जे यश मिळाले ते भाजपासाठी उत्साहवर्धक आहे. या निवडणुकीत प्रशांत किशोर आणि राहुल गांधी यांना विचार करायाला लावणारी निवडणुक पार पडली. काँग्रेसला हा सर्वात वाईट पराभव स्विकारावा लागला आहे. तसे पाहिले तर देशात ज्या-ज्या ठिकाणी विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या तेथे काँग्रेसला अपयश आले आहे. यामागील कारण शोधले तर एक बाब समोर येते राहुल गांधी हे व्यक्तीवर अधिक टिका करतात. विकासावर कमी बोलतात. देशाचा विकासबाबत एक मॉडेल जनतेसमोर ठेवत नाहीत. मतचोरी, वैयक्तिक पंतप्रधानावर टिका करतात. टिका ही ठोस असली पाहिजे. हवेत टिका जर मोठ्या एखाद्या व्यक्तीवर केली तर हसू करून घेतल्यासारखे होते. टिका करावी. विरोधीपक्षाची जबाबदारी पार पाडावी ती करताना त्यात तथ्य असावे व जनतेचा पाठींबा असला पाहिजे. बिनबुडाचे आरोप कोणालाही आवडत नाहीत. सतत अपयश येत असताना चिंतन होत नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे कार्यकर्ते जपले जात नाहीत. पक्षाचा आत्माच कार्यकर्ता असतो. त्याला सतत भेटणे, त्याची विचारपुस करणे ही सर्वात मोठी जबाबदारी हे पक्षप्रमुखांची असते. आपल्या पक्षाला सतत अपयश येत आहे यावर सखोल चिंतन होत नाही. बिहारमध्ये मोठा चपराक बसला आहे. असे असताना तेच-तेच बाबी उकरून काढल्या जात असतील तर ते योग्य नाही. बिहार या प्रदेशावर टिका करतात. मागसलेला आहे. गुंडगिरीचा अधिक असते. कायदा हातात घेणारे आहेत अशी टिका होताना त्यांनी तेजस्वी यादव यांना नाकारले त्याच प्रदेश काँग्रेसला तर मोठा चपराक दिला आहे. असे असताना बिहारमधुन भाजपाचा प्रदेशाध्यक्ष निवडला जातो या बाबत विरोधकांनी चिंतन करणे अपेक्षित आहे. आता पर्यंत बोटावर मोजण्याइतके राष्ट्रीय अध्यक्ष हे उत्तर भारतातील दिसून आले. नितीन गडकरी यांना महाराष्ट्रातून संकट काळात राष्ट्रीय अध्यक्षपद निभावले, आतातर बिहारमधून नितीन नबीन यांची आकस्तित निवड जाहिर केली. मुळात नितीन नबीन यांच्याच नेतृत्वाखाली बिहारमध्ये निवडणुक लढविली. यापुढे दक्षिणेकडील विधानसभेच्या निवडणुका लढल्या जातील व यश मोठ्या प्रमाणात पदरात पाडून घेण्याचा त्यांचा हा यशस्वी प्रयत्न असू शकतो. आता प. बंगाल सह तामिळनाडू विधानसभेत तर भाजपाला यश मिळाले तर विरोधक बोटावर मोजण्याइतके राहातील. काही दिवसापूवी काँग्रेसमुक्त भारत अशी घोषणा केली होती ती प्रत्यक्षात साध्य होती की काय असे दिसून येते. वास्तविक परवाच एका मोठ्या नेत्याचे निधन झाले. हे नेते गांधी घराण्याशी संबंधित, जवळीता असणारे मोठे नेते असताना राहुल किंवा प्रियंका तसेच सोनिया गांधी याची उपस्थिती आवश्यक असताना कोणी गांधी घराण्याचे फिरकले नाही. राष्ट्रीय अध्यक्ष आले म्हणजे सर्व झाले असे समजणे योग्य नाही. ज्यांनी पक्षाची जीवनअंता पर्यंत एकनिष्ठता बाळगली त्यांच्या निधनानंतर गांधी घराण्यातील प्रतिनिधी उपस्थित राहाणे योग्य होते. यावरून काँग्रेसमधील लहान असो किंवा मोठा नेता असो सुख-दु:खात प्रमुख नेत्याची उपस्थिती आवश्यक असते. ही मोठी पक्षासाठी जमेची असू शकते. यावेळी देशमुख परिवाराचा सहभाग बरेच काही सांगून जातो. त्यामुळे काँग्रेस पक्षाने जर पक्ष वाढवायाचा झाला तर तळागाळातील नितीन नबीन यांच्या सारख्या कार्यकर्त्यास मोठे केले पाहिजे. नितीन नबीन हे म्हणतात मला स्वप्नात देखिल वाटले नव्हते की एवढे मोठे पद मिळेल. असा आश्चर्यकारक निर्णय घेणारा भाजपा आहे म्हणून एक-एक राज्य भाजपामय होताना दिसून येत आहे. काँग्रेसकडे किती राज्य व किती आमदार, खासदार आहेत यावर चिंतन केले पाहिजे. काही झाले तरी नितीन नबीन सारख्यांच्या हाती मोठी जबाबदारी देऊन कार्यकर्त्यात एक विश्वास व्यक्त केला. हे पाहून पक्षसंघटन वेगाने वाढल्याशिवाय राहणार नाही असे दिसते.

# विजय दिन : भारतीय शौर्य, एकता आणि आत्मसन्मानाचा गौरव

१६ डिसेंबर हा दिवस भारतीय राष्ट्रजीवनात अभिमान, आत्मविश्र्वास आणि ऐतिहासिक स्मृतींनी भारलेला दिवस आहे. हा दिवस 'विजय दिन' म्हणून साजरा केला जातो. १६ डिसेंबर १९७१ रोजी भारताने पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात निर्णायक विजय मिळवला आणि बांगलादेश या स्वतंत्र राष्ट्राचा जन्म झाला. हा विजय केवळ रणांगणावर मिळालेला लष्करी विजय नव्हता, तर तो भारतीय राष्ट्रशक्तीचा, राजकीय दूरदृष्टीचा आणि मानवी मूल्यांवरील ठाम विश्र्वासाचा परिणाम होता. म्हणूनच विजय दिन हा केवळ सैन्याच्या शौर्याचा उत्सव नसून, तो संपूर्ण देशाच्या एकतेचा, त्यागाचा आणि आत्मसन्मानाचा ऐतिहासिक साक्षीदार आहे.

१९७१ च्या युद्धाची पार्श्र्वभूमी समजून घेतल्यास विजय दिनाचे महत्त्व अधिक स्पष्ट होते. तत्कालीन पाकिस्तान भौगोलिकदृष्ट्या दोन वेगळ्या भागांमध्ये विभागलेला होता त्यामध्ये पश्र्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान हे दोन भाग होते. भौगोलिक अंतरासोबतच या दोन भागांमध्ये भाषिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक दरी खोल होती. पूर्व पाकिस्तानातील बंगाली भाषिक लोकसंख्या बहुसंख्य असूनही सत्ता, प्रशासन आणि लष्करावर पश्र्चिम पाकिस्तानचे वर्चस्व होते. पूर्व पाकिस्तानावर सातत्याने अन्याय, भेदभाव आणि दडपशाही केली जात होती. लोकशाही मार्गाने व्यक्त झालेल्या जनतेच्या इच्छेचा अवमान करण्यात आला. या अन्यायाविरोधात उठलेला आवाज दडपण्यासाठी अमानुष अत्याचार करण्यात आले, ज्यामुळे परिस्थिती अधिकच चिघळली होती.

या दडपशाहीचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांना बसला. लाखो लोकांची कत्तल झाली, महिलांवर अमानवी अत्याचार झाले आणि असंख्य कुटुंबे उद्ध्वस्त झाली. या भयावह परिस्थितीमुळे सुमारे एक कोटी निर्वासित भारतात आश्रयासाठी आले. हा केवळ सीमावर्ती प्रश्र्न नव्हता, तर तो भारतासमोरील एक मोठे मानवी आणि राष्ट्रीय आव्हान होते. भारताने या संकटाकडे केवळ शेजारी राष्ट्राचा अंतर्गत प्रश्र्न म्हणून पाहिले नाही, तर मानवी दृष्टिकोनातून त्याची दखल घेतली. निर्वासितांसाठी अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्यसेवा आणि सुरक्षिततेची व्यवस्था करण्यात आली. या काळात भारतीय समाजाने दाखवलेली करुणा आणि सहिष्णुता ही भारताच्या सांस्कृतिक मूल्यांची साक्ष देणारी ठरली.

या परिस्थितीत भारताने युद्धात उतरण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय सहज किंवा घाईघाईने घेतलेला नव्हता. आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक दबाव असतानाही भारताने अन्यायाविरोधात उभे राहण्याची भूमिका घेतली. ३ डिसेंबर १९७१ रोजी युद्धाला सुरुवात झाली आणि भारतीय सैन्याने अत्यंत शिस्तबद्ध, नियोजनबद्ध आणि धैर्याने युद्ध लढले. भारतीय लष्कर, नौदल आणि वायुदल यांच्यातील उत्कृष्ट समन्वयामुळे युद्धाची दिशा लवकरच भारताच्या बाजूने झुकली. अवघ्या तेरा दिवसांत युद्धाचा निर्णायक शेवट झाला आणि १६ डिसेंबर १९७१ रोजी ढाका येथे पाकिस्तानी सैन्याने शरणागती पत्करली. सुमारे ९३ हजार पाकिस्तानी सैनिकांनी शस्त्र खाली ठेवली. आधुनिक युद्धइतिहासातील ही सर्वात मोठ्या शरणागतींपैकी एक मानली जाते.

विजय दिन हा भारतीय सैन्याच्या शौर्याचा, शिस्तीचा आणि त्यागाचा गौरव करणारा दिवस आहे. देशाच्या सीमेवर उभे राहून सैनिकांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता मातृभूमीचे रक्षण केले. अनेक जवानांनी आपले सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या या त्यागामुळेच आज भारत सुरक्षित, स्वाभिमानी आणि सार्वभौम आहे. विजय दिन साजरा करताना या शहीदांचे स्मरण करणे ही प्रत्येक भारतीयाची नैतिक जबाबदारी आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी सहन केलेला त्याग आणि वेदना कधीही विसरता कामा नयेत.

या विजयामागे केवळ सैन्याची ताकद नव्हती, तर संपूर्ण देशाची एकजूट होती. युद्धकाळात देशातील नागरिकांनी अभूतपूर्व संयम आणि राष्ट्रभक्ती दाखवली. राजकीय मतभेद, प्रादेशिक भिन्नता आणि सामाजिक अंतर बाजूला ठेवून संपूर्ण देश एकसंधपणे उभा राहिला. उद्योगधंदे, शेतकरी, कामगार, आरोग्य कर्मचारी, माध्यमे आणि सामान्य नागरिक यांनी आपल्या परीने राष्ट्रहितासाठी योगदान दिले. ही एकजूटच भारताची खरी ताकद आहे, हे १९७१ च्या युद्धाने स्पष्टपणे दाखवून दिले.

विजय दिन हा भारताच्या राजकीय परिपक्वतेचेही प्रतीक आहे. युद्ध जिंकल्यानंतर भारताने अहंकार, सूडभावना किंवा आक्रमक धोरण स्वीकारले नाही. युद्धकैद्यांशी आंतरराष्ट्रीय नियमांनुसार मानवी वागणूक देण्यात आली. शिमला कराराच्या माध्यमातून शांततेचा आणि संवादाचा मार्ग स्वीकारण्यात आला. ही भूमिका भारताच्या शांततावादी आणि जबाबदार राष्ट्र म्हणून असलेल्या प्रतिमेला अधिक बळ देणारी ठरली. सामर्थ्य असूनही संयम राखणे आणि स्थैर्याला प्राधान्य देणे, हीच भारताची खरी ओळख आहे.

आजच्या काळात विजय दिनाचे महत्त्व अधिक व्यापक स्वरूपात समजून घेण्याची गरज आहे. जागतिक पातळीवर वाढते संघर्ष, युद्धसदृश परिस्थिती आणि अस्थिरता पाहता १९७१ चा विजय आपल्याला आत्मविश्र्वास देतो. तो आपल्याला आठवण करून देतो की, भारत कोणत्याही संकटाला समर्थपणे सामोरे जाण्याची क्षमता राखतो. विजय दिन हा केवळ भूतकाळाचा गौरव नसून तो वर्तमान आणि भविष्याचा आत्मविश्र्वास आहे.

विजय दिन युवकांसाठी विशेष प्रेरणादायी ठरतो. आजचा युवक उद्याचा भारत घडवणार आहे. या दिवसातून त्याला देशप्रेम, कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि त्यागाची शिकवण मिळते. सैन्यात भरती होणे हीच देशसेवा नाही, तर प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावणे, समाजात सकारात्मक बदल घडवणे आणि राष्ट्रीय एकतेचे जतन करणे हेही देशसेवेचेच स्वरूप आहे. विजय दिन युवकांमध्ये जबाबदारीची जाणीव जागवतो.

विजय दिन साजरा करताना तो केवळ औपचारिक कार्यक्रम, परेड किंवा भाषणांपुरता मर्यादित ठेवू नये. स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि सार्वभौमत्व सहज मिळालेले नसून त्यासाठी असंख्य बलिदानांची किंमत मोजावी लागलेली आहे, याची जाणीव प्रत्येक नागरिकाने ठेवली पाहिजे. राष्ट्राच्या एकतेला, अखंडतेला आणि सुरक्षिततेला बाधा पोहोचवणाऱ्या शक्तींविरोधात सजग राहणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

विजय दिन हा भारतीय इतिहासातील एक सुवर्णक्षण आहे. हा दिवस आपल्याला अभिमानाने मान उंचावायला शिकवतो, पण त्याचबरोबर जबाबदारीची जाणीवही करून देतो. शौर्य, शिस्त, एकता आणि शांततेचा संदेश देणारा विजय दिन प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्रप्रेम अधिक दृढ करतो. १६ डिसेंबर हा दिवस केवळ स्मरणाचा नसून संकल्पाचा दिवस आहे. भारताच्या सुरक्षित, समृद्ध आणि सशक्त भविष्यासाठी एकजुटीने पुढे जाण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. म्हणूनच विजय दिन हा भारतीय शौर्याचा, आत्मसन्मानाचा आणि इतिहास घडविणाऱ्या विजयाचा अमर उत्सव आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे** (लेखक, समाजशास्त्राचे



अभ्यासक आहेत) केवळ संदेशासाठी
मो. ९९६०१०३५८२,
ईमेल - bagate.rajendra5gmail.com

# करू नका या ५ चुका, नाहीतर कमी होण्याऐवजी वाढेल वजन

खराब खाणेपिणे तसेच दिनचर्येमुळे आजकाल लठ्ठपणा वाढत चालला आहे. यामुळे बॉडीचा आकारही बिघडून जातो. वजन कमी करण्यासाठी लोक बरेच प्रयत्न करत असतात मात्र जाणते-अजाणतेपणी अशा काही चुका होतात ज्यामुळे वजन कमी होण्याऐवजी ते वाढतच जाते.

अधिक खाणे

सगळ्यात मोठा गैरसमज म्हणजे आपण जे काही हेल्दी खातो त्यामुळे वजन वाढणार नाही. खरंतर शरीरात कॅलरीज वाढल्या की वजन वाढू शकता. मग भले ही हेल्दी जरी खात असले तरी नेहमी संतुलित प्रमाणात खाल्ले पाहिजे.

केवळ खाण्या-पिण्यात सुधारणा

वजन कमी करायचे केवळ खाण्यापिण्यात सुधारणा करून काम चालणार नाही. यासाठी एक्सरसाईजही तितकीच महत्त्वाची असते. व्यायाम केल्याने कॅलरीज बर्न होतात मांसपेशी मजबूत यामुळे मेटाबॉलिज्म वाढतो.

खाणे सोडून देणे

अनेक लोक कॅलरीज कमी करण्यासाठी भूक लागल्यानंतरही खात नाहीत मात्र हे बिल्कुल योग्य नाही. भूक मिटवण्यासाठी काही जण एकाच वेळेस भरपूर खातात मात्र यामुळे वजन वाढू शकते. दिवसभर थोडे थोडे हेल्दी खाल्ले पाहिजे.

पोषकतत्वे असलेले खाणे न खाणे

वजन कमी करण्याच्या नादात अनेक लोक संतुलित खाणे खात नाहीत. याचा फोकस कॅलरीज ठेवण्यावर असतो. मात्र शरीराला चांगले बनवण्यासाठी विविध पोषकतत्वांची गरज असते. यात प्रोटीन, व्हिटामिन आणि मिनरल्सच्या कमतरतेमुळे मेटाबॉलिज्म स्लो होऊ शकतो. यामुळे बॉडीमध्ये फॅट जमा होऊ लागतात.

हेल्दी पदार्थांना अनहेल्दी बनवणे

काही पदार्थ हेल्दी असतात मात्र त्यात असे काही मिसळले जाते ज्यामुळे ते अनहेल्दी बनतात. यामुळे कॅलरीज वाढतात आणि फॅट वेगाने वाढते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## डायबिटीजच्या रुग्णांनो नको चपात्यांचा अट्टाहास, खा या धान्याच्या भाकऱ्या

सध्याच्या काळात बदलती जीवनशैली आणि अनहेल्दी फूड्स या कारणांमुळे डायबेटीस अर्थात मधुमेहाच्या रुग्णांची संख्या वेगाने वाढत आहे. त्यामुळे भारताला जगाची डायबेटीस कॅपिटल असंही म्हटलं जाऊ लागलं आहे. या विकारावर कोणताही उपाय नाही; मात्र जीवनशैली आणि खाण्यापिण्यात बदल करून ब्लड शुगर लेव्हल अर्थात रक्तातली साखर नियंत्रित करता येऊ शकते. डायबेटीस रुग्णांना आपल्या आहाराची विशेष काळजी घ्यायला हवी. डायबेटीस रुग्णांना लो कार्ब आणि हाय प्रोटीन डाएटचा सल्ला दिला जातो. हाय प्रोटीन डाएटमध्ये डायबेटीस रुग्ण गव्हाच्या चपातीऐवजी ज्वारी, जव, नाचणी या धान्यांच्या भाकऱ्यांचा समावेश करू शकतात.

जव : डायबेटीस दोन प्रकारचा असतो. टाइप वन डायबेटीसमध्ये इन्सुलिनची निर्मिती करणाऱ्या पेशी नष्ट होऊ लागतात. टाइप टू डायबेटीसमध्ये शरीरात पुरेशा प्रमाणात इन्सुलिनची निर्मिती होऊ शकत नाही. मुंबईच्या आर. व्ही. आयुर्वेद हॉस्पिटलचे डॉक्टर गोरक्षनाथ आव्हाड सांगतात, की जव हे मोठं धान्य अर्थात मिलेट आहे. जगातलं हे चौथं सर्वांत महत्त्वाचं धान्यपीक आहे. त्यात फायबर्स, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन के, पॉलिफेनॉल्स, फ्लेव्होनॉइड्स आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. या सगळ्याचा आरोग्याला मोठा उपयोग होतो. जव या धान्याचा ग्लायसेमिक इंडेक्स खूप कमी असतो. त्यामुळे ब्लड शुगर लेव्हल नियंत्रित राहते. जवाचं पीठ हादेखील डायबेटीस रुग्णांसाठी एक आरोग्यदायी पर्याय आहे. या पिठात कार्बोहायड्रेट्स कमी असतात आणि ते पचायलाही हलकं असतं. ग्लुकोजची पातळी नियंत्रित करायला जव हे धान्य मदत करतं.

नाचणीरागी : नाचणी किंवा रागी या धान्याला इंग्रजीत फिंगर मिलेट असं म्हणतात. हे बाजरीच्या कुळातलं धान्य आहे. या कुळातल्या अन्य धान्यांच्या तुलनेत नाचणीत सर्वाधिक कॅल्शियम आणि पोटॅशियम असतं. त्याशिवाय प्रोटीन, कार्बोहायड्रेट्स आणि डाएटरी फायबर्सदेखील त्यात असतात. त्यात व्हिटॅमिन बीचे घटक - थायमिन, रायबोफ्लेव्हिन, नियासिन आणि फॉलिक ॲसिड यांच्यासह आयर्न आणि फॉस्फरसदेखील असतं. नाचणीच्या पिठात अन्य कोणतंही ग्लूटेन फ्री पीठ किंवा गव्हाचं पीठ चांगल्या रीतीने मिसळून त्याची रोटीभाकरी करू शकता. नेहमीच्या गव्हाच्या चपातीपेक्षा हा एक चांगला पर्याय आहे.

कुट्टू : डायबेटीसचे रुग्ण आपल्या आहारात गव्हाच्या चपातीऐवजी कुट्टू या धान्याच्या पिठाची रोटीदेखील समाविष्ट करू शकतात. त्यामुळे रक्तशर्करा नियंत्रित होण्यास मदत होते. त्यात प्रोटीन, मॅग्नेशियम, फायबर्स आणि लोह यांसारखे पौष्टिक घटक असतात.

## लिव्हरसाठी सुपरफूड आहेत 'हे' ४ पदार्थ, दररोज करा सेवन



यकृत हा मानवी शरीरातील सर्वात महत्वाचा अवयव आहे. शरीरात असलेल्या अशुद्धी यकृताद्वारे विष्ठा आणि मूत्राद्वारे बाहेर टाकल्या जातात. आरोग्य तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, ज्या व्यक्तीचे यकृत निरोगी असते, त्याच्या संपूर्ण शरीरातील सर्व अवयव आणि कार्ये योग्यरित्या कार्य करतात.

परंतु आजच्या जीवनशैली, खाण्याच्या सवयी आणि राहणीमानामुळे लोकांना यकृताशी संबंधित अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. जेव्हा यकृताशी संबंधित आजार सुरू होतात तेव्हा लोक त्याकडे लक्ष देत नाहीत, ज्यामुळे ते भविष्यात गंभीर आजारांना बळी पडतात.

आता मोजमाप करण्यासाठी टेपची गरज नाही! तुमच्या स्मार्टफोनच्या साह्यानं मोजा वस्तूचा आकार

आता मोजमाप करण्यासाठी टेपची गरज नाही! तुमच्या स्मार्टफोनच्या साह्यानं मोजा वस्तूचा आकार

आज, या लेखाद्वारे, आम्ही तुम्हाला यकृत निरोगी ठेवण्यासाठी कोणते पदार्थ आहाराचा भाग बनवावेत हे सांगणार आहोत. ज्यामुळे तुम्हाला यकृत निरोगी ठेवण्यास मदत होईल. चला तर मग जाणून घेऊया हे पदार्थ कोणते आहेत..

आवळा-

आवळा हा व्हिटॅमिन सीचा एक उत्तम स्रोत आहे. तुम्ही तुमच्या नियमित आहारात आवळा नक्कीच समाविष्ट करावा. आवळा शरीरात जमा झालेले विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतो. आवळा खाल्ल्याने यकृतात साचलेली अशुद्धता दूर होते. तसेच, यकृत देखील निरोगी होते. आवळा खाल्ल्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि त्वचा उजळते. आवळा शरीराच्या अनेक समस्या देखील दूर करतो. यकृत निरोगी ठेवण्यासाठी, तुम्ही दररोज सकाळी एक आवळा किंवा आवळ्याचा रस घेऊ शकता.

लिंबू पाणी-

लिंबू पाणी प्यायल्याने शरीर हायड्रेट राहते. तुमचे यकृत निरोगी ठेवण्यासाठी, तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी लिंबू पाणी पिऊ शकता. यासाठी एक ग्लास कोमट पाणी घ्या. त्यात लिंबाचा रस मिसळा आणि प्या. दररोज लिंबू पाणी पिल्याने तुमचे आरोग्य चांगले राहते. लिंबू पाणी शरीर आणि यकृतामध्ये जमा झालेले विषारी पदार्थ काढून टाकण्यास देखील मदत करते.

हंगामी फळे-

फळे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. यकृत मजबूत करण्यासाठी, तुम्ही हंगामी फळांचे सेवन केले पाहिजे. फळांमध्ये अँटिऑक्सिडंट गुणधर्म आढळतात, जे यकृत निरोगी ठेवतात. फळे शरीराला फ्री रॅडिकल्सपासून संरक्षण करण्यास मदत करतात. ऋतूनुसार तुम्ही फळे खाऊ शकता. दररोज सकाळी १-२ फळे खाल्ल्याने तुम्हाला दिवसभर चांगले वाटू शकते.

भाज्यांचा रस-

तुमचे यकृत निरोगी ठेवण्यासाठी तुम्ही दररोज सकाळी भाज्यांचा रस पिऊ शकता. भाज्यांमध्ये फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर असतात, जे एकूण आरोग्यासाठी आवश्यक असतात. भाज्यांचा रस पिल्याने यकृताचे आरोग्य मजबूत होते. तसेच, यकृत सहजपणे डिटॉक्स होते. तुम्ही भोपळा, दुधी भोपळा, काकडी किंवा हिरव्या पालेभाज्यांचा रस पिऊ शकता. सकाळी रिकाम्या पोटी भाज्यांचा रस पिणे खूप फायदेशीर आहे. यामुळे तुमच्या त्वचेची चमकही वाढेल.

# हिवाळ्यातील सुपर ड्रिंक गाजर ज्यूस रेसिपी

साहित्य-ताजे गाजर - ४-५ मध्यम आकाराचे
आले - १ छोटा तुकडा
लिंबाचा रस - १ चमचा
काळे मीठ
काळी मिरी पावडर चिमूटभर
पाणी -१ कप
बर्फाचे तुकडे
या हिवाळ्यात चवदार गाजर कोफ्ते बनवा; खूप सोपी विधी
कृती-सर्वात आधी गाजर धुवा, सोलून घ्या आणि लहान तुकडे करा. गाजराचे तुकडे, आले आणि थोडे पाणी मिक्सर जारमध्ये घाला. गुळगुळीत पेस्ट तयार होईपर्यंत चांगले मिसळा. रस चाळणीतून किंवा मलमलच्या कापडातून गाळून घ्या जेणेकरून कोणतेही तंतू निघून जातील. गाळलेल्या रसात लिंबाचा रस आणि मीठ घाला आणि बर्फासह सर्व्ह करा.
टिप्स-ताजे, लाल गाजर निवडा; ते जास्त गोड असतात.
हवे असल्यास थोडे मध घाला.
बीटरूट किंवा सफरचंद घालून एबीसी ज्यूस बनवा.
रोज सकाळी रिकाम्या पोटी पिणे सर्वात फायदेशीर आहे.
हा ज्यूस ५ मिनिटांत तयार होतो आणि खूप ताजेतवाने आहे.





## आपल्या खंडोबाची आरती

जय देवा खंडेराया । निजशिवरुप सखया ॥
आरती ओवाळीतो । भावभंडारसुप्रीया ॥ धृ. ॥
देहत्रय गड थोर । हेचि दुर्घट जेजूर ।
तेथे तूं नांदतोसी ॥ आत्मसाक्षित्वे निर्धार ॥
उन्मनी म्हाळसा हे । शांतिबाणाई सकुमार ।
भुक्ति मुक्ति दया क्षमा । मुरळ्या नाचती सुंदर ॥ जय. ॥ १ ॥
स्वानंद अश्व थोर त्यावरि बैसोनि सत्वर ॥
अद्वैतबोध तीव्र । हाती घेउनि तरवार ॥
अहंकार मल्लासूर । त्यातें मारिसी साचार ॥
निवटुनी दैत्यगार । विजयी होसी तूं मल्हार ॥ जय. ॥ २ ॥
निरसोनी द्वैत भाव । करिसी तूं ठाणे अपूर्व । अद्वैतची भक्तदेव ।भेदबुद्धी मिथ्या वाव ।
तुजवीण न दिसे कोणी । जगिं या एकचि तू धणी ॥
मौनी म्हणे तुची सर्व । अससी व्यापक खंडेराव ॥
जय देवा. ॥ ३ ॥

# तुम्हाला तुमचा सोलमेट सापडला आहे का हे कसे जाणून घ्यावे



आपल्याला अनेकदा वाटते की 'सोलमेट' किंवा 'आत्मसाथी' फक्त रोमँटिक सिनेमांमध्येच असतात. पण खऱ्या आयुष्यातही सामान्य माणसांना त्यांचे सोलमेट्स भेटतात.
सोलमेट म्हणजे केवळ पती-पत्नी किंवा प्रियकर-प्रेयसी असा अर्थ होत नाही; ते तुमचे मित्र असू शकतात किंवा एखादे समान ध्येय साध्य करणारे सहकारीही असू शकतात.
सोलमेट भेटणे म्हणजे अशी व्यक्ती भेटणे जी तुमच्या आयुष्याचाच एक भाग आहे, हे समजणे. सोलमेट तुमच्या आयुष्यावर दीर्घकाळ प्रभाव टाकतात. जीवनाच्या प्रवासात स्वतःच्या मर्यादा ओलांडून प्रगती करण्यासाठी तुम्हाला एकमेकांची गरज असते.
सोलमेट म्हणजे काय?
सोलमेट ही अशी व्यक्ती असते जिच्याशी तुमचे खूप खोलवर नाते असते, पण हे नाते अवलंबून असणारे किंवा लाचारीचे नसते. या नात्यात दोन्ही व्यक्तींच्या गरजा समान रित्या पूर्ण होतात. केवळ प्रेमाची अपेक्षा न करता, प्रेम देण्याची तयारी असणे

## हिवाळ्यात कोरडी त्वचा आणि कोंडा दूर करण्यासाठी

हिवाळ्यातील थंड हवा त्वचेतील ओलावा काढून टाकते आणि डोक्यातील कोंडा, डोक्यातील कोंडा, डोक्यातील कोंडा होऊ शकते. कोरडी त्वचा आणि डोक्यातील कोंडा महागड्या उत्पादनांनी बरा होऊ शकत नाही, परंतु योग्य काळजीने त्यावर उपचार केले जाऊ शकतात. आपल्या आजींनी केलेले उपाय आजही उपयुक्त आहेत.
हिवाळ्यात तुमची त्वचा चमकदार करण्यासाठी फक्त दोन गोष्टी वापरा
हिवाळ्यात कोरडी त्वचा आणि डोक्यातील कोंडा हा आजार नाही, तर अयोग्य काळजीचा परिणाम आहे. रसायनांनी भरलेली उत्पादने तात्पुरती आराम देतात परंतु समस्येचे मूळ कारण दूर करत नाहीत. जर तुम्हाला तुमच्या त्व-चेला आणि केसांना नैसर्गिक चमक हवी असेल, तर काही घरगुती उपाय निरोगी टाळू राखण्यास आणि कोणत्याही दुष्परिणामांशिवाय डोक्यातील कोंडा दूर करण्यास मदत करू शकतात. हिवाळ्यात कोरडी त्वचा आणि डोक्यातील कोंडा दूर करण्यासाठी येथे काही घरगुती उपाय आहेत.
चरीरींहळ
विजय दिवस ऐतिहासिक युद्धाचा दिवस
हा उपाय कोरडी त्वचा आणि कोंडा दोन्हीसाठी प्रभावी आहे. कोमट नारळाच्या तेलात चिमूटभर कापूर मिसळून मालिश करा. यामुळे टाळूमध्ये रक्ताभिसरण वाढते आणि बुरशीजन्य कोंडा दूर होतो, तसेच त्वचा मऊ होते.
-ङडज ठए-ऊ त्वचेची काळजी घेण्यासाठी बदाम तेलाने मसाज केल्याचे फायदे जाणून घ्या



कोरफड जेल
कोरफड हा हिवाळ्यातील सर्वात विश्वासार्ह घटकांपैकी एक आहे. कोरफड जेल थेट तुमच्या चेहऱ्यावर आणि टाळूवर लावा. ते जळजळ कमी करते, खाज कमी करते आणि गमावलेला ओलावा परत मिळवते.
मोहरीचे तेल
हिवाळ्यातील त्वचेची काळजी घेण्यासाठी हा एक प्रभावी उपाय आहे. रात्री तुमच्या शरीरावर, टाळूवर आणि केसांवर कोमट मोहरीचे तेल लावा. ते तुमच्या त्वचेला खोलवर पोषण देते आणि कोरडेपणा कमी करते.
दही आणि लिंबू हेअर पॅक
कोंडा दूर करण्यासाठी, दह्यामध्ये लिंबाचा रस काही थेंब मिसळा आणि तो तुमच्या टाळूला लावा. यामुळे कोंडा दूर होईल आणि तुमचे केस मऊ होतील. तुम्ही आठवड्यातून एकदा हा पॅक लावू शकता.
मध आणि दुधाचा फेस मास्क:
मध आणि कच्चे दूध मिसळून चेहऱ्याला लावा. हा फेस पॅक फक्त १५ मिनिटांत तुमची त्वचा मऊ आणि चमकदार बनवतो.
अस्वीकरण (ऊळीलश्ररळाशी) : या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत दै. लातूर समाचार कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# बळीराजा हतबल; सरकारचे पाठबळ मिळेल का?



विमा योजनेचे लाभही शेतकर्यांना नीट मिळत नाहीत. पंचनामे चुकीचे, विमा कंपन्यांचे फसवे कवच, कमी भरपाई यांमुळे शेतकरी हवालदिल होतो, आपत्ती काळात विमा संरक्षण प्रभावी असले पाहिजे; पण तेच शेतकर्यांच्या अडचणी वाढवतात.
शेतकर्यांचे सरकार अशा घोषणा करणारे राज्यातील महायुतीचे सरकार शेतकर्यांच्या प्रश्नांबाबत किती संवेदनशून्य आहे याची झलक राज्यसभेत विचारल्या गेलेल्या एका प्रश्नातून समोर आली. महाराष्ट्रात गेल्या तीन महिन्यांत ७६६ शेतकर्यांनी आत्महत्या केल्याचे वास्तव राज्यसभेतील सदस्या फौजिया खान यांनी मांडले. यापैकी आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या २०० कुटुंबांना कोणतीही आर्थिक मदत मिळाली नसल्याचे त्यांनी सांगितले. राज्य विधिमंडळातही परवा अतिवृष्टीग्रस्त शेतकर्यांना दिल्या जाणार्या मदतीचा मुद्दा चर्चिला गेला. अतिवृष्टीग्रस्त शेतकर्यांसाठी 'पॅकेज'ची घोषणा झाली; पण शेतकर्यांच्या पदरात काय पडले? संपूर्ण कर्जमाफीची घोषणा अद्याप कागदावरच राहिली आहे. अतिवृष्टीग्रस्त शेतकर्यांना १०६ कोटी पैकी केवळ ७५ हजार रुपये वाटण्यात आल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. त्यावर विरोधकांनी सरकारची खरडपट्टी काढली. ऑक्टोबर महिन्यात मुख्यमंत्री सहायता निधीत १०६ कोटी ५७ लाख रुपये जमा झाले; मात्र त्यातील केवळ ७५ हजार रुपये वितरित करण्यात आले. देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या कार्यकाळात जाहीर झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत पात्र ठरलेले साडेसहा लाख शेतकरी अद्याप या योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. शेतकर्यांच्या मदतीसाठी सरकारने ३२ शासकीय आदेश (जीआर) काढले; पण प्रत्यक्षात मदत किती जणांना आणि किती मिळाली हा संशोधनाचा विषय ठरावा. कोकणातील शेतकर्यांसाठी मदतीचा एक निकष तर पश्चिम महाराष्ट्रातील शेतकर्यांसाठी दुसरा निकष ही विसंगती सत्ताधारी भाजपचेच मंत्री नितेश राणे यांनी सभागृहासमोर आणली. शेतकर्यांप्रति सरकार किती बेफिकीर आहे, याची स्पष्ट कबुली सरकारच्या घोषणा आणि प्रत्यक्ष कृतीतून पुढे येते. अतिवृष्टीग्रस्त शेतकर्यांसाठी ३१ हजार कोटी मदतीची घोषणा झाली; पण त्यापैकी निम्मीही मदत शेतकर्यांपर्यंत अद्याप पोहोचलेली नाही.
अर्थव्यवस्थेचा कणा-राज्यसभेत फौजिया खान यांनी शेतकर्यांच्या आत्महत्येचा प्रश्न उपस्थित करताना शेतकरी सरकारला प्रिय कधी होणार असा प्रश्न विचारला. हा केवळ राजकीय प्रश्न नाही, तर सरकारच्या नैतिकतेवर बोट ठेवणारा प्रश्न आहे. सरकारे बदलतात, धोरणे बदलतात, घोषणा होतात; पण शेतकर्यांच्या परिस्थितीत बदल करण्याची राजकीय इच्छाशक्ती कोणत्याही राजकीय पक्षाने दाखवलेली नाही, हे वास्तव आहे. शेतकरी देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे, असे म्हटले जाते; पण त्याच्यासाठी काय केले जाते हा प्रश्नच आहे. ७६६ शेतकर्यांच्या आत्महत्या ही केवळ संख्या नाही, ती लाखो शेतकर्यांच्या कुटुंबातील वेदनेची आणि प्रस्थापित अव्यवस्थेची आणि शेतीच्या दुर्दैवी अवस्थेची साक्ष आहे. राज्य सरकारने जाहीर केलेली कोट्यवधीच्या मदतीची पॅकेजेस अतिवृष्टीग्रस्तांसाठी कोट्यवधीचा निधी, सातबारा कोरा करण्याच्या दिलेल्या घोषणा ही सारी आकडेवारी दिमाखाने माध्यमाद्वारे दाखवली जाते; पण या निधीचा उपयोग शेतकर्यांना खरोखरीच झाला का आणि किती हे प्रश्न अनुत्तरितच राहतात. केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले की, महाराष्ट्र सरकारने अतिरिक्त मदत मागितलेलीच नाही, दुसरीकडे राज्य सरकार पूरस्थिती गंभीर असून, केंद्राकडून मिळणारी मदत अपुरी असल्याची कारणे देत होते. मग यात खरे-खोटे काय? राज्य सरकारने पूरग्रस्त क्षेत्र १४.३६ लाख हेक्टर दाखवले; परंतु केंद्राला पाठवलेल्या अहवालात ते केवळ १ लाख १० हजार ३०९ हेक्टर दाखवले. ही आकडेवारीतील चूक अंतिमतः शेतकर्यांना मिळणार्या आर्थिक मदतीवरही परिणाम करते. शेतकर्यांच्या आत्महत्या, मदतीच्या पॅकेजची ढिसाळ अंमलबजावणी, आकडेवारीतील विसंगती ही व्यवस्थेतील अपयशाची कारणे आहेत. शेतकरी देशाचा कणा असेल तर तो सन्मानाने जगेल अशी व्यवस्था निर्माण करणे हीच खरी गरज आहे.

## शांत झोप हेच खरे डिप्रेशनवरचे औषध

### डॉक्टर टीप्स



त्यात शांत झोप झालेले लोक व शांत झोप नसलेले लोक यांच्या चित्रणात फरक दिसून आला. ज्यांची झोप नीट झाली त्यांच्यात मेडियल प्रीफ्रंटल कॉर्टेक्स या भागातील क्रियाशीलता बंद झाली.
या भागातील कृतिशीलता ही नैराश्यावर नियंत्रण ठेवण्यास मदत करीत असते. तर, झोप नसेल तर मेंदूतील भावना केंद्रे ही जास्त क्रियाशील होतात व त्यामुळे मन अस्वस्थ होते. यात सहभागी वैज्ञानिक सिमॉन यांनी दिलेल्या माहितीनुसार संशोधनात सहभागी तीस जणांच्या अभ्यासात ज्यांची रात्रीची झोप शांत होती त्यांच्यात नैराश्याचे प्रमाण कमी होते. यात २८० जणांचा अभ्यास ऑनलाइन पद्धतीने करण्यात आला. त्यातही, ज्यांची रात्रीची झोप शांत होती त्यांच्यात नैराश्याचे प्रमाण दुसऱ्या दिवशी कमी होते.




## विनोद

वडील : रामु, असे काहीतरी काम कर की ज्यामुळे तुझे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात जाईल.
रामु : पण बाबा जगाला कसा कानाकोपरा? पृथ्वी तर गोल आहे.

## संदेश

Teacher: OXFORD matlab kya hai?
Student: OX matlab bail, FORD matlab Gaadi. to OXFORD matlab bail gaadi

## सुविचार

प्रयत्न हा परिस असुन त्याच्या योगाने वाळवंटाचे नंदनवन करता येते. - **अज्ञात**



### संस्कृत सुभाषित

**विद्वत्वं दक्षता शीलं**
**संस्कारान्तिरनुशीलम् ।**
**शिक्षकस्य गुणा: सप्त**
**सचेत्सत्वंप्रसन्नता ।**

**अर्थ :** विद्वत्ता, दक्षता, चारित्र्य शील, संस्कार, करण्याची क्षमता, दयाळूपणा, चैतन्य आणि प्रसन्नता असे ते सात गुण आहे. आदर्श शिक्षकाच्या ठिकाणी आवश्यक असणारे गुण.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. गाळ पण टाकाऊ नाही
२अ. ताळतंत्र सुटलेला
५. रोड टॅक्स-मराठीत
८. तोंडाचा पट्टा
११. पुरणपोळीबरोबर केली जाणारी आमटी
१२. अटीची भाषा
१४. चीज, वस्तू
१५. त्याग केला
१७. अर्धांगवायू
१९. ढीग
२१. सत्ता
२३. उत्तराधिकारी
२४. वाघाची मावशी
२५. शेवट, नाश
२६. मालक, सरदार, शासनसत्ता
२८. पाण्यापासून उत्पन्न
३१. चामखीळ
३३. एकरूप
३४. झाडाचे टॉनिक
३५. सरस्वती (ग्र.)
३६. बातमी
३७. वारा, त्रास
३८. भांडण
४०. कैफ, धुंदी
४२. कधी मर्दानगीचे कधी भिकारपणाचे लक्षण
४३. नऊ भावना
४५. कडक व चिवट
४६. एक देवयोनी, स्वर्गातील गायक
४७. संत, अवलिया
४८. रागाचा ठिकाणा
४९. गंमत, मजा
५०. स्वयंपाकी
५३. आवाजांचा गोंधळ
५४. सन्मानाची रक्कम
५६. खोदकाम
५८. पुत्री, मुलगी
६०. लाकडी जिना
६२. दात
६४. जबरदस्त, धिप्पाड
६७. चेहऱ्यावरील कांती
६८. काळ्या तोंडाचे माकड
७०. राजपुत्र सलीमची प्रेयसी
७२.सवाद्य
७४. हिंदीत झणझणीत
७५. गायीचे पिल्लू
७७. शिक्षा
७८. मोगऱ्याची माळ
८०. खूळ
८२. अगदी सरळ
८३. दुसऱ्याच्या मनातील जाणणारा
८४. रशावरील तवंग, कट

### उभे शब्द

१. उमदा, रंगेल
२. बतावणी
३. आलेख- चढता वा उतरता
४. पुरुष
५. घागरा
६. बटवा
७. रमापती
८. पृथ्वी, गाय
९. पूर्ण भरतीची वेळ
१०. सिंह
१३. समशेर
१६. पुत्र (हिंदी)
१८. दिवस
२०. लिंबू पाणी
२२. गंध
२४. पतंगाचा धागा
२५. अकस्मात
२६अ. ईदने सांगता होणारा उपवासाचा महिना
२७. खोकला
२८. पाणी देणारा
२९. फळातील द्रव
३०. वस्ती
३२. जास्तीत जास्त व कमीत कमी
३३. टोळीचा प्रमुख
३४. धोकादायक
३७. संधी
३९. बरोबर आलेला फौजफाटा
४१. शिक्षा
४३. पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
४४. संपूर्ण
५०. घराणे
५१. शर्करा
५२. पाडाव, हार
५५. फायदा
५७. पुरुष
५९. वनवास
६१. दार
६३. हुण्डा (हिंदी)
६५. घरंदाज, कुलीन स्त्री
६६. टपालकचेरी
६९. मत देणे
७१. मुंग्यांचे घर
७३. धट्टकट्टा
७६. फटाक्यांची माळ
७७. उथळ पसरट वाटी
७९. रात्र
८१. निर्माण झालेले अंतर

### आडवे उत्तर

१.छाना २अ.बेभान ५.पथकर ८.वसवस ११.कट १२.जरतर १४.सामानसुमान १५.टाकला १७.लकवा १९.रास २१.लवाद २३.वारदार २४.मांजर २५.अस्त २६.सरकार २८.नीरजा ३१.मस ३३.समरस ३४.खत ३५.सारजा ३६.समाचार ३७.वात ३८.कलह ४०.नशा ४२.दाढी ४३.नवरस ४५.वातड ४६.किन्नर ४७.पीर ४८.नाक ४९.मौज ५०.खानसामा ५३.कलकल ५४.मानधन ५६.खनन ५८.तनया ६०.दादर ६२.रदन ६४.तगडा ६७.रया ६८.वानर ७०.अनारकली ७२.वाजतगाजत ७४.तीखा ७५.वासरू ७७.सजा ७८.गजरा ८०.नाद ८२.सरळसोट ८३.मनकवडा ८४.तर्री

### उभे उत्तर

१.छाकटा २.नरम ३.भाजणी ४.नर ५.परकर ६.कसा ७.रमावर ८.वसुधा ९.समा १०.वनराज १३.तलवार १६.ताल १८.वासर २०.सरबत २२.वास २४.मांजा २५.अचानक २७.कास २८.नीरद २९.रस ३०.वसाहत ३२.कमालकिमान ३३.सरदार ३४.खतरनाक ३७.वाव ३९.लवाजमा ४१.शासन ४३.नरकयातना ४४.सकल ५०.खानदान ५१.साखर ५२.पतन ५५.नफा ५७.नर ५९.अरण्यवास ६१.दरवाजा ६३.दहेज ६५.गरती ६६.डाकखाना ६९.मतदान ७१.वारूळ ७३.तगडा ७६.सर ७७.सट ७९.रात ८१.दरी



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### २ सामने गमावूनही दोन दिवसांआधी साहेबांची प्लेइंग ११ जाहीर

ॲडलेड-इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघात पाच कसोटी सामन्यांची प्रतिष्ठित ॲशेस मालिका खेळवली जात आहे. जिथं ऑस्ट्रेलियानं सुरुवातीचे दोन्ही सामने जिंकून मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. आता दोन्ही संघांमधील तिसरा सामना ॲडलेड ओव्हलवर खेळवला जाणार आहे. पण आता याआधीच इंग्लंडनं आपली प्लेइंग ११ जाहीर केली असून त्यात शेवटच्या सामन्यापासून एक बदल केला आहे.

गस ॲटकिन्सन संघाबाहेर : इंग्लंडकडून दुसऱ्या कसोटी सामन्यात गस ॲटकिन्सनची कामगिरी फारशी चांगली झाली नाही. त्याला दोन्ही डावांत मिळून केवळ तीन बळी घेता आले आणि फलंदाजीतही तो फारसा योगदान देऊ शकला नाही. याच कारणामुळं त्याला प्लेइंग इलेव्हनमधून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला असून त्याच्या जागी जोश टंगचा समावेश करण्यात आला आहे. टंगनं आतापर्यंत ६ कसोटी सामने खेळले असून यात त्याने ३१ विकेट घेतल्या आहेत.

### २९ वर्षात पहिल्यांदाच भारत बनला वर्ल्ड चॅम्पियन, 'या' खेळाडूंनी ...

दिल्ली,१५ डिसेंबर-चेन्नईच्या एक्सप्रेस एवेन्यू मॉल खेळवण्यात आलेल्या स्क्वॉश वर्ल्ड कप फायनलमध्ये भारतीय संघाने हॉन्गकॉन्गला ३-० ने पराभूत करून इतिहास रचला आहे. मिक्स्ड टीम इव्हेंटमध्ये भारताचा हा पहिला गोल्ड मेडल होता. यापूर्वी भारताचं सर्वश्रेष्ठ प्रदर्शन हे २०२३ मध्ये ब्रॉन्झ मेडल होतं. या स्पर्धेत एकूण १२ संघांनी सहभाग घेतला होता. भारताच्या सेमी फायनलमध्ये सर्वात मजबूत मानल्या जाणाऱ्या मिस्र संघाला हरवून भारतीय संघाने फायनलमध्ये स्थान मिळवलं होतं. फायनल सामन्यात भारतीय खेळाडूंनी सुरुवातीपासूनच मजबूत पकड बनवली आणि ती शेवटपर्यंत राहिली. सामन्यात भारतीय संघाकडून सुरुवात दिग्गज क्रिकेटर जोशना चिनप्पा यांनी केली. अंतिम सामन्याच्या पहिल्या लढतीत जोशनाने हाँगकाँगच्या यी ली (जागतिक क्रमवारीत ३७) हिचा ३-१ असा पराभव करून भारताला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर अभय सिंगने ॲलेक्स लाऊचा ३-० असा पराभव केला. निर्णायक सामन्यात १७ वर्षाच्या अनाहत सिंहने टोमेटोला ३-० ने हरवून ऐतिहासिक विजय पक्का केला.

### वानखेडेवर झाले मेस्सीचे जोरदार स्वागत, सचिनेही मराठीतून मानले आभार

मुंबई,-फुटबॉलचा बादशाह लिओनेल मेस्सी हा तब्बल १४ वर्षांनी भारतात आलाय. मेस्सी तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर असून तो कोलकाता, हैद्राबाद, मुंबई आणि दिल्ली या शहरांमध्ये कार्यक्रम घेऊन त्याच्या फॅन्सना भेटणार आहे. मेस्सीचा हा भारत दौरा त्याच्या भारतीय फॅन्ससाठी खूपच खास आहे. त्यामुळे आपल्या आवडत्या फुटबॉलरची एक झलक पाहायला मिळावी यासाठी फॅन्स भारतातील विविध शहरांमधून मेस्सी भेट देणाऱ्या शहरांमध्ये पोहोचत आहेत. रविवार १४ डिसेंबर रोजी लिओनेल मेस्सी हा देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत दाखल झाला. येथे वानखेडे स्टेडियम एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात फॅन्स सह सेलिब्रिटी आणि

### ३५९ खेळाडूंवर ७७ जागांसाठी बरसणार २३७.५५ करोड; कधी होणार आयपीएल २०२६ मिनी-लिलाव?

मुंबई-आयपीएल ही जगातील सर्वाधिक पाहिली जाणारी लीग आहे आणि इथे खेळून अनेक स्टार खेळाडूंनी त्यांचं करिअर घडवलं आहे. आता आगामी हंगामासाठी स्टेज सज्ज झाला आहे. सर्व संघांनी त्यांच्या राखीव आणि सोडलेल्या खेळाडूंच्या यादी आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलकडे सादर केल्या आहेत. सर्वांचे लक्ष आता १६ डिसेंबर रोजी होणाऱ्या मिनी लिलावावर आहे.१६ डिसेंबर रोजी आयपीएल मिनी लिलाव : आयपीएल २०२६ चा मिनी-लिलाव १६ डिसेंबर रोजी अबुधाबी इथे होणार आहे. तो एका दिवसात पूर्ण होईल, भारतीय वेळेनुसार दुपारी २:३० वाजता सुरु होईल. हा मिनी-लिलाव असल्यानं, संघांना राईट टू मॅच (ठढच) पर्याय वापरता येणार नाही.लिलावात एकूण ७७ खेळाडू करता येणार खरेदी : आयपीएल २०२६ च्या लिलावासाठी एकूण ३५९ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

## प्रोजेक्ट महादेवामधून गुणवान खेळाडू मिळतील : मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई : मिशन ऑलिम्पिक २०२६ अंतर्गत महाराष्ट्रातून अधिकाधिक सुवर्णपदके मिळवणे आणि २०३४ पर्यंत फुटबॉल विश्वचषकासाठी तयारीचे लक्ष्य ठेवून'प्रोजेक्ट महादेवा' राबवण्यात येत आहे.या प्रोजेक्टमधून नक्कीच गुणवान खेळाडू मिळतीलअशी आशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनातर्फे'प्रोजेक्ट महादेवा'या राज्यस्तरीय क्रीडा उपक्रमाचा शुभारंभ आज वानखेडे स्टेडियम येथे करण्यात आला.'प्रोजेक्ट महादेवा'हा उपक्रम महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन,व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन ,वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन ,सिडको आणि महाराष्ट्र शासनाचा क्रीडा विभाग या विविध संस्थांच्या विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

जागतिक फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी,अर्जेटीनचे माजी खेळाडू लुईस सुआरेझ आणि रॉड्रिगो डिपॉल,क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे,खासदार प्रफुल्ल पटेल,भारतरत्न सचिन तेंडुलकर,भारतीय लोकप्रिय फुटबॉलपटू सुनील छेत्री,भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार राहुल भेके,महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्राचे)चे



मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी,श्रीमती अमृता देवेंद्र फडणवीस,गोट टूर प्रमोटर सत्तद्रू दत्ता,टायगर श्रॉफ, अजय देवगण,कार्तिक आर्यन,दिनों मोरिया,जिंदाल ग्रुपच्या पार्थ जिंदल,वेदना जिंदल यांनी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'प्रोजेक्ट महादेवा'हा महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाचा उपक्रम आहे,जो संपूर्ण राज्यात तरुण फुटबॉल मधील प्रतिभेचा (१३ वर्षांखालील) शोध घेवून फुटबॉल मधील उच्च दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत शिष्यवृत्ती, परदेशी प्रशिक्षकांकडून जागतिक दर्जाचे प्रशिक्षण आणि सर्वांगीण विकासाची संधी दिली जाणार आहे. निवडलेल्या ६० खेळाडूंची (३० मुले,३० मुली) पाच वर्षांची संपूर्ण निवासी शिष्यवृत्ती मिळणार आहे. तसेच अव्वल खेळाडू नक्कीच फिफा विश्वचषक मध्ये खेळतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.'प्रोजेक्ट महादेवा'हा उपक्रम महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन,व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन ,वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन ,सिडको आणि महाराष्ट्र शासनाचा क्रीडा विभाग या विविध संस्थांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे धोरणात्मक दिशा, तळागाळातील सहभाग, व्यावसायिक फुटबॉल कौशल्य, पायाभूत सुविधा आणि प्रशासकीय पाठबळ मिळून राज्यात एक सक्षम आणि शाश्वत फुटबॉल विकास व्यवस्था उभी राहणार आहे.

प्रोजेक्ट महादेवा हा महाराष्ट्र शासनाचा एक महत्त्वाचा उपक्रम आहे,जो संपूर्ण राज्यात तरुण फुटबॉल प्रतिभेचा (१३ वर्षांखालील) शोध घेण्यासाठी आणि त्यांना विकसित करण्यासाठी सुरू करण्यात आला आहे.

या अंतर्गत शिष्यवृत्ती, परदेशी प्रशिक्षकांकडून जागतिक दर्जाचे प्रशिक्षण आणि सर्वांगीण विकासाची संधी दिली जाणार आहे. निवडलेल्या ६० खेळाडूंची (३० मुले,३० मुली) पाच वर्षांसाठी संपूर्ण निवासी शिष्यवृत्ती मिळणार आहे.

## बुमराह परतणार पण अक्षर पटेल नाही खेळणार, टीम इंडिया चिंतेत



धरमशाला : दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पाच टी ट्वेंटी सामन्यांच्या मालिकेत भारताने २-१ अशी आघाडी घेतली. धरमशाला येथे झालेला सामना भारताने सात विकेट राखून जिंकला. याआधी भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा कटकचा टी ट्वेंटी सामना १०१ धावांनी जिंकला तर दक्षिण आफ्रिकेने चंदिगड येथील टी ट्वेंटी सामना ५१ धावांनी जिंकला. आता लखनऊ आणि अहमदाबाद येथे प्रत्येकी एक टी ट्वेंटी सामना होणार आहे. मालिका जिंकण्यासाठी भारताला उर्वरित दोन पैकी किमान एक सामना जिंकणे आवश्यक आहे. भारतीय संघ विजयी घोडदौड कायम ठेवण्यास उत्सुक असताना भारतासाठी एक चिंता वाढवणारी बातमी आली आहे.

टीम इंडियाचा अष्टपैलू क्रिकेटपटू अक्षर पटेल आजारी पडला आहे. डॉक्टरांनी अक्षरला विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे. अक्षरवर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. यामुळे अक्षर पटेल लखनऊ आणि अहमदाबाद येथील टी ट्वेंटी सामन्यांमध्ये खेळणार नाही. जसप्रीत बुमराह कौटुंबिक कारणामुळे धरमशाला येथील सामना खेळला नव्हता. घरातील जवळची व्यक्ती रुग्णालयात असल्यामुळे बुमराह विशेष परवानगी घेऊन धरमशालाचा सामना खेळण्याऐवजी नातलगाला भेटण्यास गेला होता. पण लखनऊ आणि अहमदाबादच्या टी ट्वेंटी सामन्यांसाठी बुमराह उपलब्ध आहे. यामुळे अक्षर नसला तरी बुमराह आहे असा विचार करुन टीम इंडियाला पुढील सामन्यांसाठी नियोजन करावे लागणार आहे.

## फक्त ९५ चेंडूत १७१ धावा करणारा वैभव आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळू शकणार नाही

मुंबई : भारताच्या वैभव सूर्यवंशीने १९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेत यूएई विरुद्ध ९५ चेंडूत १७१ धावा केल्या. ही ऐतिहासिक खेळी करुनही वैभवला आणखी काही महिने आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळता येणार नाही.भारताने १९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेत ५० षटकांत सहा बाद ४३३ धावा केल्या होत्या. धावांचा पाठलाग करणाऱ्या यूएईने ५० षटकांत सात बाद १९९ धावा केल्या होत्या. भारताने हा सामना २३४ धावांनी जिंकला. या सामन्यात वैभवच्या वादळी खेळीमुळे भारताचा विजयाचा मार्ग सोपा झाला. पण एवढा वादळी खेळ करुनही वैभवला आणखी काही महिने आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळता येणार नाही.

आयसीसीच्या नियमानुसार आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्यासाठी खेळाडूने १५ वर्षे वयाची अट पूर्ण करणे आवश्यक आहे. वैभव



सूर्यवंशीचा जन्म २७ मार्च २०११ रोजी झाला आहे. वैभवला वयाची अट पूर्ण करण्यासाठी आणखी किमान १०१ दिवस थांबावे लागणार आहे. या एका नियमामुळे वैभव सूर्यवंशी सध्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळू शकत नाही.

वैभव हा एक उदयोन्मुख क्रिकेटपटू आहे. वय त्याच्या बाजूने आहे. थोडा संयम बाळगला आणि खेळात सातत्य ठेवले, आत्मविश्वासाने क्रिकेट खेळत राहिला तर वैभव लवकरच आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळू शकेल, असे मत क्रिकेट तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

## द्रविडशी पंगा, रोहितचेही ऐकले नाही : गिल

मुंबई-मागच्या १८ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एकही अर्धशतक न झळकावलेल्या शुभमन गिलचा फॉर्म टीम इंडियासाठी चिंतेचा विषय बनला आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात गिलने २८ बॉलमध्ये २८ रन केले. ७ फेब्रुवारीपासून भारतात टी-२० वर्ल्ड कप सुरू होत आहे, त्याआधी टीम इंडिया दक्षिण आफ्रिकेविरुद्ध २ आणि न्यूझीलंडविरुद्ध ५ टी-२० अशा एकूण ७ मॅच खेळणार आहे, त्यातच शुभमन गिलचा फॉर्म बघता त्याला टी-२० वर्ल्ड कपच्या टीममध्ये निवडायचे का नाही? असा प्रश्न निर्माण झाला आहे.शुभमन गिलला टीममधून वगळले तर यशस्वी जयस्वाल आणि संजू सॅमसन हे दोन पर्याय तयार आहेत, पण त्यातच आता आणखी एका खेळाडूने ओपनरच्या जागेवर दावा ठोकला आहे. सय्यद मुश्ताक अली टी-२० ट्रॉफीमध्ये इशान किशनच्या नेतृत्वात झारखंडने लागोपाठ ९ वा विजय मिळवला. मध्य प्रदेशविरुद्धच्या सामन्यात इशान किशनने वादळी अर्धशतक झळकावलं, त्यामुळे झारखंडने मध्य प्रदेशचा १ रनने पराभव

## पंजाब किंग्सची धुरा श्रेयस अय्यरकडे?



मुंबई : बीसीसीआय सध्या आयपीएल २०२६ च्या मिनी लिलावाची तयारी करत आहे.

या दरम्यान, मागील हंगामातील फायनलिस्ट असलेल्या पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यर लिलावात सहभागी होणार आहे. अय्यरने आता मजबूत संघ तयार करण्याची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली जाण्याची शक्यता आहे. मात्र, या वेळी पंजाब किंग्सला त्यांचे प्रशिक्षक रिकी पाँटिंग यांची कमतरता जाणवणार आहे, कारण त्यांनी मिनी लिलावातून स्वतःला बाजूला केले आहे. दुसरीकडे, न्यूझीलंडचा दिग्गज (डॅनियल व्हिटोरी) मात्र आपल्या संघाला सोडत नाही.

रिपोर्ट्सनुसार, आयपीएल २०२६च्या मिनी लिलावात पंजाब किंग्सच्या टेबलवर कर्णधार श्रेयस अय्यर दिसण्याची शक्यता आहे. अय्यर सध्या पूर्णपणे फिटनेस मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे आणि याच कारणामुळे तो टेबलवर उपस्थित राहू शकतो. पंजाब किंग्सचे मुख्य प्रशिक्षक रिकी पाँटिंग मात्र टेबलवर दिसणार नाहीत.पाँटिंग सध्या 'द शेस २०२५-२६' मध्ये कॉमेंट्री करत आहेत. तिथून त्यांना रिलीज केले जाणार नाही. त्यामुळे ते ऑस्ट्रेलियातूनच आपल्या संघाला मदत करतील. लिलावाच्या वेळी एका संघाच्या टेबलवर फक्त ८ सदस्यच उपस्थित राहू शकतात. त्यामुळे सर्व फ्रँचायझी या सदस्यांची यादी आधीच बीसीसीआयला पाठवतात. ऑस्ट्रेलिया संघासोबत जोडलेले डॅनियल व्हिटोरी (सनरायझर्स हैदराबादचे कोच) मात्र या लिलावात उपस्थित राहतील. त्यांनी ऑस्ट्रेलियन संघाशी याबद्दल चर्चा केली आहे. सनरायझर्स हैदराबादने मागील हंगामात फार चांगली कामगिरी केली नव्हती. त्यामुळे व्हिटोरी या वेळी टेबलवर बसून मागील हंगामातील चुका सुधारण्याचा पूर्ण प्रयत्न करतील.



## डब्ल्यू डब्ल्यू ई चॅम्पीयन; जॉन सीनाची कुस्ती विश्वातून अखेर निवृत्ती

मुंबई : 'नेव्हर गिव्ह अप' असे म्हणत अवघ्या जगाला दोन दशकांहून जास्त काळ वेड लावणार्या जॉन सीना याने अखेर गिव्ह अप केले. पण, हे गिव्ह अप, करताना त्याच्या चेहर्यावर हसू आणि डोळ्यात अश्रू होते. वॉशिंग्टनमध्ये पार पडलेल्या सॅटर्डे नाईट मेन इव्हेंटमधला सामना हा जॉन सीनाच्या रेसलिंग कारकीर्दीचा शेवटचा सामना होता. गेल्या वर्षी जुलै महिन्यातच जॉन सीना याने डब्लू ड्ब्लू ई कुस्ती विश्वातून निवृत्त होणार अशी घोषणा केली होती. तेव्हापासूनच जॉन सीनाची फेअरवेल सीरिज सुरु झाली. वर्षभरात अनेक देशांमध्ये सामने खेळल्यानंतर वॉशिंग्टन डीसीच्या कॅपिटन वन स्टेडियममध्ये जॉन सीनाची शेवटचा सामना झाला.

रेसलिंग विश्वात जवळपास सगळे विश्वविक्रम मोडणारा, हॉलिवूडमध्येही अभिनयातून आपले कसब दाखवणारा ग्लोबल आयकॉन अशी जॉन सीनाची ओळख बनली. २३ वर्षांच्या कारकीर्दीत जॉन सीना याने २,३२० सामने खेळले. त्यापैकी एक हजार ८१८ सामने जिंकले.कर्ट अँकलपासून अंडरटेकरपर्यंत, शॉन मायकलपासून ब्रॉक लेसन्सरपर्यंत, सीएम फंकपासून रँडी ऑर्टनपर्यंत... इतकंच नाही तर अगदी अलीकडच्या काळातील रेसलर्स असलेल्या रोमन रिंग्जपासून कोडी र्हो ड्सपर्यंत... जॉन सीनानं अशा अनेक चॅम्पियन्सला हरवत, एकापाठोपाठ एक सामना जिंकत, विक्रमांच्या पायर्या चढल्या.



सगळ्यात महत्वाचं म्हणजे चाहत्यांशी असलेल्या त्याचा कनेक्ट ही त्याची जमेची बाजू होती. म्हणूनच की काय थथए मधून काही काळाचा ब्रेक घेतल्यानंतर जेव्हा सीनानं फिल्मी पडद्यावर एन्ट्री घेतली तेव्हा तो तिथेही सुपटस्टार ठरला. द मरीन, १२ राऊंड, ट्रेनरेक, डॅडीज होम (सीरिज), बम्बल बी, फास्ट अँड फ्युरियस ९ आणि १०, द सुसाईट स्क्वॉड, पीसमेकर, हेड ऑफ स्टेट, जॅकपॉट, फ्रीलान्स, हिडन स्ट्राईक, इंडिपेंडेंट यासह अनेक ब्लॉकबस्टर सिनेमांमधून जॉन सीनानं कमाईचे अनेक विक्रम मोडले. मोठ्या पडद्या मिळणारं यश, वाढलेल्या चाहता वर्ग... अशात ४८ वर्षांच्या जॉनला रेसलिंगसाठी वेळ मिळत नव्हता. म्हणूनच की काय गेल्या दोन-तीन वर्षांपासून सीना रेसलिंग रिंगमध्ये उतरलाच नव्हता. पण, इतक्या मोठ्या ग्लोबल स्टारला निरोप देण्यासाठी मॅनेजमेंटकडून मेगा प्लॅनिंग झालं. त्यासाठी सीनाला जवळपास एक वर्ष चित्रपटापासून दूर रहावं लागलं. आज गंथरसोबतच्या सामन्यात जेव्हा सीनानं टॅपआऊट करत सामना गिव्ह अप केला, तेव्हा चाहत्यांनाच नाही तर अनेक सुपरस्टार्सनाही त्याचा धक्का बसला. पण, टॅप आऊट करत असताना सीनाच्या चेहर्यावरचं हसू पाहून चाहत्यांनी सीना पुन्हा रिंगमध्ये दिसेल अशा चर्चाही सुरु केली आहे. कारण, त्याला निरोप देत असतानाच रेलसर ब्रॉक लेस्नर याने नेहमी आयुष्यात छान मित्र राहु अशी पोस्ट लिहली. त्यामुळे हॉल ऑफ फेम झालेल्या जॉन सीनाची पुन्हा रिंगमध्ये एन्ट्री होणार की रॉकसारखा एखादा गेस्ट ॲपियरन्स दिसणार, हे पुढील काही दिवसांमध्येच कळेल. पण, तुर्तास तरी... थँक यू सीना...

# बंद पडलेल्या कारखान्यातून पुन्हा गोडवा फुलला

## किल्लारी निळकंठेश्वर साखर कारखान्याने ५० हजार मे. टन गाळपाचा टप्पा गाठला



**औसा/प्रतिनिधी :** गेल्या पंधरा वर्षांपासून बंद अवस्थेत असलेल्या किल्लारी येथील निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्यातून पुन्हा एकदा गोड साखर बाहेर पडू लागली असून, या साखरेसोबतच शेतकऱ्यांच्या जीवनातही गोडवा निर्माण झाला आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि सहकारावर ठेवलेल्या ठाम विश्वासामुळे बंद, विक्रीस काढलेला आणि ''पुन्हा सुरू होणार नाही'' असा शिक्का बसलेला हा कारखाना आज पुन्हा कार्यरत झाला आहे. कारखाना सुरू झाल्याने या भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, स्थानिक उद्योगांना चालना मिळाली आहे तसेच रोजगारनिर्मितीला नवी दिशा प्राप्त झाली आहे.

किल्लारी येथील निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्याने सोमवारी सकाळी निळकंठेश्वराच्या आशीर्वादाने ५० हजार मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट यशस्वीरीत्या पूर्ण करून एक ऐतिहासिक आणि अभिमानास्पद टप्पा पार केला. हा टप्पा म्हणजे केवळ गाळपाचा आकडा नसून, सहकाराच्या ताकदीवर विश्वास ठेवणाऱ्या शेतकरी बांधवांची जिद्द, त्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम आणि सामूहिक प्रयत्नांचे हे जिवंत प्रतीक आहे.पंधरा वर्षे धूळ खात पडलेला हा कारखाना पुन्हा एकदा पूर्ण क्षमतेने उभा राहताना दिसत आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे, ठाम निर्णयक्षमतेमुळे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कारखान्याला नवे जीवन लाभले आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आशा, आत्मविश्वास आणि भविष्यातील सुरक्षिततेचे तेज स्पष्टपणे दिसून येत आहे.

या ऐतिहासिक यशाबद्दल सर्व सभासद शेतकरी बांधव, कारखान्याचे अधिकारी, अभियंते, कर्मचारी आणि संबंधित सर्व घटकांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. प्रत्येकाच्या मेहनतीतून, समर्पणातून आणि सहकाराच्या भावनेतूनच आज हा कारखाना पुन्हा उभा राहून प्रगतीच्या मार्गावर ठामपणे वाटचाल करत आहे.

या निमित्ताने आमदार अभिमन्यू पवार यांनी समस्त शेतकरी बांधवांना पुन्हा एकदा आश्वस्त केले आहे की, निळकंठेश्वराचे आशीर्वाद आणि शेतकरी बांधवांचे भक्कम पाठबळ यांच्या जोरावर किल्लारी निळकंठेश्वर साखर कारखान्याचा संपूर्ण कायापालट केल्याशिवाय ही वाटचाल थांबणार नाही. हा केवळ प्रारंभ असून, येणाऱ्या काळात हा कारखाना सहकार क्षेत्रातील एक आदर्श आणि प्रेरणादायी मॉडेल म्हणून नावारूपाला येईल, असा दृढ विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला आहे.

किल्लारी येथील निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्याने ५० हजार मे. टन गाळपाचा टप्पा पूर्ण करणे हा माझ्यासाठी आणि समस्त शेतकरी बांधवांसाठी अभिमानाचा क्षण आहे. पंधरा वर्षे बंद असलेला कारखाना सहकाराच्या माध्यमातून पुन्हा सुरू करणे हे मोठे आव्हान होते; मात्र शेतकऱ्यांच्या विश्वासामुळे आणि निळकंठेश्वराच्या कृपाशीर्वादामुळे हे शक्य झाले. हा कारखाना शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्याचा आधार बनेल. रोजगारनिर्मिती, उद्योगवाढ आणि पारदर्शक कारभारातून किल्लारी कारखान्याचा संपूर्ण कायापालट करण्याचा माझा निर्धार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी ही वाटचाल अखंड सुरू राहील.

**आमदार अभिमन्यू पवार**

केंद्रराज्याच्या भक्कम पाठबळावर किल्लारी कारखान्याचा पुनर्जन्म , आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नांना यश

किल्लारी येथील निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखाना सुरू करण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी केलेले आर्थिक व प्रशासकीय प्रयत्न निर्णायक ठरले आहेत. अनेक वर्षे बंद असलेला हा कारखाना पुन्हा सुरू करणे हे मोठे आव्हान होते; मात्र केंद्र व राज्य सरकारच्या भक्कम सहकार्यामुळे हे शक्य झाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी दिलेल्या सकारात्मक पाठबळामुळे कारखान्याच्या पुनरुज्जीवनासाठी आवश्यक निधी आणि मान्यता मिळाली. या समन्वयातूनच किल्लारी कारखान्याला नवे जीवन मिळाले असून शेतकरी, रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा दिलासा मिळाला आहे.

### लातूर मनपा निवडणुकीसाठी काँग्रेसकडून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती कार्यक्रम जाहीर; १७ आणि १८ डिसेंबर रोजी मुलाखतीचे आयोजन!

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगा कडून महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकीचा निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यानंतर लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. याच तयारीचा एक भाग म्हणून, पक्षाच्या वतीने इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिलेल्या माहितीनुसार, काँग्रेस पक्षाच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती काँग्रेस भवन, लातूर येथे आयोजित करण्यात आल्या आहेत. हा कार्यक्रम १७ आणि १८ डिसेंबर अशा दोन दिवसांत होणार आहे. १७ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजेपासून ते दुपारी ४ वाजेपर्यंत प्रभाग १ ते प्रभाग १२ मधील सर्व इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या जातील. त्यानंतर, १८ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजेपासून ते दुपारी १ वाजेपर्यंत उर्वरित प्रभाग, म्हणजेच प्रभाग १३ ते प्रभाग १८ येथील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने जाहीर केलेल्या या कार्यक्रमानुसार, सर्व इच्छुक उमेदवारांनी निर्धारित वेळेत काँग्रेस भवन येथे उपस्थित राहावे, असे आवाहन ॲड. किरण जाधव यांनी केले आहे. या मुलाखतींनंतर महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारांची अंतिम यादी निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.

### अभियंता नितीन पाटील यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** अभियंता नितीन पाटील यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित करण्यात आलेला गौरव सोहळा काल अत्यंत उत्साहात व भावनिक वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व औद्योगिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. या प्रसंगी मा. आबासाहेब चव्हाण (बीड राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष अजित पवार गट), परळी पंचायत समिती सभापती गोविंद देशमुख, लातूरचे नामांकित उद्योजक दिलीपजी माने, भाजपा नेते विक्रमकाका शिंदे, अजितराव शिंदे (कासारखेडा), बळवंत काळे (चिकुर्डा), मदनराव काळे, पाटील परिवाराचे निकटवर्तीय गोपाळ शिंदे, प्रकाश फंड, पद्माकर जाधव, अतुल धनंजय देशमुख, शेंद्री येथील रविकिरण राजेनिंबाळकर (व्याही), धाराशिव येथील केशवराव पाटील (सासरे), विक्रमदादा पडवळ, डॉ. डी. के. पाटील, डॉ. दाताळ, अनिल बादाडे यांच्यासह लातूर शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर व पाटील परिवाराचे स्नेही असे सुमारे २५० ते ३०० नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमात परिवारातील कन्या डॉ. भक्ती पाटील हिने केलेल्या भावूक भाषणाने उपस्थितांची मने जिंकली. तिच्या शब्दांतून वडिलांच्या प्रतिचा आदर, कृतज्ञता व अभिमान व्यक्त झाला. यावेळी मुख्य कार्यकारी अभियंता अमर पाटील यांनीही मनोगत व्यक्त करत, नितीन पाटील यांच्या कार्यकुशलतेचा, रोखठोक व प्रामाणिक स्वभावाचा विशेष उल्लेख केला. खेळीमेळीच्या वातावरणात काम करत सर्वांना सोबत घेऊन जाण्याची त्यांची भूमिका उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले. इतर मान्यवरांनीही आपल्या भाषणातून नितीन पाटील यांच्या मनमोकळ्या, सहकार्यशील स्वभावाबद्दल गौरवोद्गार काढत, त्यांच्या पुढील आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांनी भोजनाचा आस्वाद घेतला. आनंदी व उत्साही वातावरणात हा सेवानिवृत्ती गौरव सोहळा यशस्वीरित्या पार पडला.

### मालमत्ता कराच्या शास्ती मध्ये ७०% सुट; दिनांक ३१ जानेवारी पर्यंत शास्ती माफी योजनेची मुदतवाढ

**लातूर/प्रतिनिधी :** महापालिकेच्या कर संकलन विभागामार्फत नागरिकांसाठी ७० टक्के शास्ती माफी योजना जाहीर करण्यात आली असून, या योजनेचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी २०२६ निश्चित करण्यात आला आहे. प्रलंबित मालमत्ता कर असलेल्या नागरिकांसाठी ही योजना मोठा दिलासा ठरणार आहे. महापालिकेच्या हद्दीतील मोठ्या प्रमाणावर प्रलंबित मालमत्ता कर बाकी असून त्याची वसुली गतीमान करण्यासाठी ही विशेष माफी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत नागरिकांनी ३१ जानेवारीपूर्वी एकरकमी कर भरल्यास शास्तीपैकी तब्बल ७० टक्के माफी मिळणार आहे. दरम्यान, प्रलंबित कर वसुलीसाठी महापालिकेकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. दररोज क्षेत्रस्तरावर वसुली मोहीम, नोटीस वाटप आणि करदात्यांशी थेट संवादाच्या माध्यमातून जागृती केली जात आहे. ३१ जानेवारीनंतर प्रलंबित करदारांवर जप्ती इत्यादी कठोर कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही कर विभागाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी ही सुवर्णसंधी ओळखून प्रलंबित कर तात्काळ भरावा आणि ७०% शास्ती माफीचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी केले आहे.

## २६ डिसेंबर २०२५ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात सावित्री कलयुगातली हा मराठी चित्रपट रिलीज होणार

**मुंबई/मोईज सितारी:** मराठी सिनेमा सावित्री कलयुगातली ह्या मराठी चित्रपटांचे वैशिष्ट्य अस आहे की आपल्या रूढी परंपरा जोपासत जुन्या नव्या ची सांगड घालत भावनात्मक सिनेमा बनवला आहे. सावित्री कलयुगातली हा मराठी आपल्या महाराष्ट्रामध्ये वटसावित्री पूजेचा म्हणून हा सण साजरा केला जातो .म्हणून सगळ्यांनाच सत्यवानाची सावित्री माहित आहेच. आजही स्त्रिया किती मॉडर्न झाल्या तरी वटसावित्रीची पूजा करतात. पती-पत्नीचे नातं जपणारा हा सण . आई-वडिलांच्या अती लाडामुळे किंवा कधी कधी मुलाच्या बऱ्याचश्या चुकांवर आई पांघरून घालते आपल्या लाडाच्या पदराखाली आपलंच मूल बिघडते हे कदाचित तिच्या लक्षात येत नसते म्हणूनच की काय घटस्फोटाचे प्रमाण जास्त वाढलेत , म्हणून आम्ही सामाजिक बांधिलकी म्हणून संदेश देऊन कुटुंब व्यवस्थेला हातभार लावणे साठी हा एक प्रयत्न आहे. पण तरीही प्रत्येक स्त्री आपल्या पतीच्या संकट समई आपल्या पतीसोबत सत्यवानाच्या सावित्री सारखी उभी राहते. मुलावर जर संकटाची अशीच काही वेळ आली तर ,आई वडिलांची माया सुद्धा त्याच्या पाठीशी उभी राहते. असंच काहीसं या चित्रपटात तुम्हाला पाहायला मिळेल.

निर्माता खानदेश सुपुत्र कराटे मास्टर नानासाहेब बच्छाव निजामपूर (धुळे) जय मल्हार एंटरटेनमेंट वर्ल्ड व एसपी एंटरटेनमेंट वर्ल्ड यांचा पहिला मराठी चित्रपट सावित्री कलयुगातली.




कथा पटकथा दिग्दर्शन प्यारेलाल शर्मांचे आहे.सह निर्माती धनश्री बच्छाव, सहनिर्माता रवी कुमार तर चित्रपटाच्या लीड रोल मध्ये अभिनेता पवन चौरे व अभिनेत्री महेक शेख मुख्य भूमिकेत आहेत.

नकारात्मक मुख्य भूमिकेत आहेत श्री जयराज नायर व खलनायकच्या रोलमध्ये नानासाहेब बच्छाव यांनी काम केले आहे. मुख्यभूमिकेत अभिनेत्री श्वेता भामरे आहे, निशान पवार रवी कुमार श्री जी एस पाटील श्री राकेश शिर्के डॉ.अविनाश पाटील किरण ब्राम्हणे व बालकलाकार नमो तर चित्रपटाचे संवाद लेखन सुजाता पवार राकेश शिर्के यांचे आहे.

सावित्री कलयुगातील हा मराठी चित्रपट २६ डिसेंबर २०२५ रोजी रिलीज होत आहे. सगळ्यांनी थेटरला जाऊन एकदा पाहवा .

या चित्रपटामध्ये मला लीड रोल करण्याचे योग आला असे आभिनेत्री श्वेता भामरे यांनी सांगितले .आयुष्यात या चित्रपटामुळे खूप काही शिकायला मिळेल आणी आदर्श घेण्यासारखा चित्रपट आहे. या चित्रपटाची कहाणी चांगली आहे, गाणी पण एका हून एक भारी आहे. मनाला वेड लावणारा आहे हा चित्रपट आहे. चित्रपट गृहात जावून सर्वांनी पाहावा.

राज्यवन मंत्री आदरणीय गणेशजी नाईक यांनी या चित्रपटाचे ट्रेलर पोस्टर लॉन्च केले व शुभेच्छा दिल्या. दिग्दर्शक प्यारेलाल शर्माने साहेबांनी या चित्रपटासाठी खूप मेहनत घेतली आहे. अखेर त्यांनी २६डिसेंबर २०२५रोजी रिलीज होणार आहे असे जाहीर केले. मिडिया पार्टनर सुनील भोसले यांनी न्यूज देणे, प्रचार प्रसार करणे हे निस्वार्थी पणे केले.

### लातूर शहर जिल्हा भाजपाने घेतल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

**लातूर/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच महानगरपालिकेच्या निवडणूक लवकरच होऊ घातल्या आहेत. त्या अनुषंगाने लातूर शहर जिल्हा भाजपाने निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांचे अर्ज मागितले होते. या प्रक्रियेला मोठा प्रतिसाद मिळाला असल्याने ९०० पेक्षा अधिक उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती शहर जिल्हा भाजपाच्यावतीने पार पडल्या आहेत.



महानगरपालिका निवडणूकीचे वेध सर्वांनाच लागले असून लातूर शहर जिल्हा भाजपाने या निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. निवडणूकीसाठी उमेदवारांची निवड सर्वात कठीण प्रक्रिया आहे. प्रदेश भाजपने दिलेल्या सूचनेनुसार शहर जिल्हा भाजपने मनपा निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांचे अर्ज शहर जिल्हा भाजपा कार्यालयात दाखल करण्यास सांगितले होते. याकरिता शहरातील इच्छुकांनी मोठा प्रतिसाद देत ७० जणांसाठी ९०० पेक्षा अधिक उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. ज्या इच्छुकांनी पक्षाकडे अर्ज दाखल केले आहेत त्यांच्या मुलाखती घेण्याच्या सूचना प्राप्त झाल्यानंतर शहर भाजपाने त्या इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. या मुलाखतीसाठी प्रत्येकी दोघांचे असे चार पॅनल नियुक्त करण्यात आले होते. यामध्ये माजी खा. डॉ. सुनील गायकवाड, माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी, गुरुनाथ मगे, देविदास काळे, प्रेरणा होनराव, सुधीर धुत्तेकर शैलेश गोजमगुंडे, दिपक मठपती, आदींचा समावेश होता. या मुलाखती ईशान स्केअर येथे घेण्यात आल्या आहेत.

या मुलाखतींमध्ये इच्छुकांना कोणते प्रश्न विचारायचे आणि त्यांच्याकडून कोणती माहिती घ्यायची याबाबत प्रदेश भाजपने सूचना केल्या होत्या. त्या सूचनेनुसार मुलाखत घेणारी इच्छुक उमेदवारांकडून प्रश्नांची उत्तरे जाणून घेत त्यांच्याकडून आवश्यक असणारी माहिती संकलित केली. मुलाखत देण्यासाठी आलेले इच्छुक मोठ्या उत्साहाने आणि आत्मविश्वासाने मुलाखतीस सामोरे जाताना दिसले. मुलाखतीला येताना कोणतेही शक्तीप्रदर्शन करू नये अशा सूचना दिल्यामुळे हि प्रक्रिया अतिशय शांततेत पार पडली. मुलाखती घेतल्यानंतर या सर्व उमेदवारांची माहिती प्रदेश भाजपकडे पाठवण्यात येणार असून या नंतर प्रदेशच्या वतीने उमेदवार निवडीसाठी सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाच्या अहवालानुसार निकषात बसणाऱ्या पात्र उमेदवारींची निश्चिती होईल आणि त्यानंतर प्रदेशकडूनच उमेदवारींची घोषणा होईल असे शहर जिल्हा भाजपाच्या वतीने जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले आहे.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाच्या राहुल यांनी अखिल भारतीय शरीरसौष्ठव स्पर्धेत राष्ट्रीय सन्मान मिळवला

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर विभागाचे सिनिअर सीसीटीसी श्री राहुल चिंदा यांनी उत्कृष्ट क्रीडा कामगिरी करून मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाला पुन्हा एकदा अभिमान आणि गौरव मिळवून दिला आहे.

झारखंडमधील चक्रधरपूर येथे झालेल्या ३९ व्या अखिल भारतीय शरीरसौष्ठव स्पर्धेत श्री राहुल चिंदा यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. रेल्वे क्रीडा प्रोत्साहन मंडळाच्या (आरएसपीबी) अंतर्गत दक्षिण पूर्व रेल्वे क्रीडा संघटनेने ही प्रतिष्ठित स्पर्धा आयोजित केली होती, ज्यामध्ये देशभरातील प्रतिभावान रेल्वे खेळाडूंचा सहभाग होता.

उल्लेखनीय समर्पण, शिस्त आणि उत्तम सादरीकरण करत, श्री राहुल चिंदा यांनी ८० किलो वजनी गटात विविध रेल्वे झोनमधील अव्वल शरीरसौष्ठवपटूंविरुद्ध स्पर्धा करत प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरी आणि एकूणच शारीरिक तंदुरुस्तीचा आणखी एक पुरावा म्हणून, त्यांना चॅम्पियनशिपचा सर्वोच्च सन्मान असलेल्या ''चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स'' किताबाचा विजेता म्हणूनही घोषित करण्यात आले.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा, अपर विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री अंशुमाली कुमार, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक श्री योगेश पाटील आणि क्रीडा अधिकारी श्री आदित्य त्रिपाठी यांनी श्री राहुल चिंदा यांचे त्यांच्या प्रेरणादायी यशाबद्दल अभिनंदन केले आणि त्यांच्या भविष्यातील क्रीडा प्रयत्नांमध्ये उत्कृष्टता कायम राहावी, ज्यामुळे रेल्वे आणि देशाला आणखी गौरव मिळेल अशी शुभेच्छा दिल्या. ही उल्लेखनीय कामगिरी भारतीय रेल्वेने प्रोत्साहन दिलेल्या मजबूत क्रीडा संस्कृतीला अधोरेखित करते आणि कर्मचाऱ्यांना केवळ त्यांच्या कार्यालयीन जबाबदाऱ्यांमध्येच नव्हे तर क्रीडा आणि तंदुरुस्तीमध्येही उत्कृष्ट कामगिरी करण्यास प्रोत्साहित करण्याच्या सोलापूर विभागाच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करते.




# पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाची महापारेषणला तीन राष्ट्रीय पारितोषिके प्रदान

## -सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया अँड पीआर - भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान विशेष पुरस्कार

**डेहराडून :** पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिकांचे वितरण उत्तराखंड विधानसभेच्या अध्यक्ष रितू खंडुरी भूषण व माजी मुख्यमंत्री तथा माजी केंद्रीय मंत्री डॉ. रमेश पोखरियाल निशंक यांच्या हस्ते झाले. यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया अँड पीआर, सर्वोत्कृष्ट फिल्म (इंग्रजी) व भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान हा विशेष पुरस्कार मिळाला. महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पारितोषिकांबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी जनसंपर्क विभागाचे अभिनंदन केले. उत्तराखंडमधील डेहराडूनच्या हॉटेल एमरॉल्डमध्ये आयोजिलेल्या ४७ व्या भारतीय जनसंपर्क परिषदेच्या समारंभात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी पीआरएसआयचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अजित पाठक, सचिव डॉ. पीएलके मूर्ती, गेल इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संदीप गुप्ता, पद्मश्री डॉ. बी. व्ही. के. संजय यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**जनसंपर्क विभागाचे काम कौतुकास्पद: डॉ. संजीव कुमार**

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी यशाचे श्रेय जनसंपर्क विभाग व त्यांच्या टीमवर्कला दिले आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक तब्बल १४ राष्ट्रीय पुरस्कार व एक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळविणारा महापारेषणचा जनसंपर्क विभाग अव्वल ठरला आहे. सृजनशील व नावीन्यपूर्ण काम व मीडियात सातत्याने होणारे नवे बदल समजून जनसंपर्क विभागाने कामांमध्ये वैविध्यता आणून सकारात्मक बदल केले. मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर-साकोरे, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला यांनीही महापारेषणचे अभिनंदन केले आहे.




डेहराडून : येथे पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने महापारेषणच्या जनसंपर्क विभागाला उत्तराखंड विधानसभेच्या अध्यक्ष रितू खंडुरी भूषण यांच्या हस्ते तीन पारितोषिके देण्यात आली. पारितोषिके स्वीकारताना महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे. शेजारी माजी मुख्यमंत्री डॉ. रमेश पोखरियाल निशंक, पीआरएसआयचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अजित पाठक, सचिव डॉ. पीएलके मूर्ती, गेल इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संदीप गुप्ता, पद्मश्री डॉ. बी. व्ही. के. संजय.

# दोस्ती ग्रुप कडून, हॉकी खेळाडू आराध्या धस हिचा सत्कार



कळंब(प्रतिनिधी)-विशाखापट्टणम येथे झालेल्या राष्ट्रीय इनलाईन हॉकी राष्ट्रीय स्पर्धे साठी महाराष्ट्र टिम मधुन आराध्या प्रदिप धस हीची निवड होऊन विशाखापट्टणम येथे राष्ट्रीय इनलाईन स्पर्धेत खेळल्या बद्दल तीचा व पालकांचा कळंब येथील निवासस्थानी दोस्ती ग्रुप च्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी सतिश टोणगे, संदीप भैय्या बाविकर, प्रताप मोरे , पार्श्वनाथ पाटील, प्रकाश धस , बाळासाहेब धस, पालक प्रदिप धस यांनी तिचा सत्कार केला व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कुमारी आराध्य धस ही पिंपळगाव डोळा ता.कळंब जिल्हा धाराशिव येथील असुन , या गावातील ही एकमेव खेळाडू ठरली आहे. तिच्या या यश बद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# क्रीडा सप्ताहाचा उद्घाटन समारंभ उत्साहात संपन्न

धाराशिव (जिमाका) दि.१५ डिसेंबर : राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेत क्रीडाविषयक वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने शासनामार्फत दरवर्षीप्रमाणे जिल्हास्तरावर क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात येते.त्यानुसार दिनांक १२ ते १८ डिसेंबर,२०२५ या कालावधीत क्रीडा सप्ताह साजरा करण्यात येत असून,या उपक्रमाचा उद्घाटन समारंभ १२ डिसेंबर, २०२५ रोजी श्रीपतराव भोसले हायस्कूल, धाराशिव येथे संपन्न झाला.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व श्रीपतराव भोसले हायस्कूल, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमास डॉ. चंद्रजीत जाधव (शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी, सरचिटणीस - महाराष्ट्र राज्य खो-खो संघटना व उपाध्यक्ष - महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटना) तसेच श्री.अदित्यभैय्या पाटील (कार्यकारी अधिकारी, श्रीपतराव भोसले हायस्कूल, धाराशिव) हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी श्री.प्रमोद कदम (उपमुख्याध्यापक,श्रीपतराव भोसले हायस्कूल, धाराशिव), श्री.प्रविण बागल (शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी),श्री. श्रीकांत हरनाळे (जिल्हा क्रीडा अधिकारी,धाराशिव) व श्री.भैरवनाथ नाईकवाडी (तालुका क्रीडा अधिकारी) यांची उपस्थिती लाभली.

सर्व मान्यवरांच्या हस्ते मेजर ध्यानचंद व खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर मान्यवरांचा सन्मानचिन्ह देऊन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी स्वागत केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. हरनाळे यांनी केले.

श्री.अदित्यभैय्या पाटील (कार्यकारी अधिकारी) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शैक्षणिक जीवनासोबतच क्रीडेत सक्रिय सहभाग घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. चंद्रजीत जाधव यांनी विद्यार्थ्यांना खेळाच्या सरावात सातत्य ठेवण्याचा सल्ला दिला तसेच क्रीडा क्षेत्राकडे करिअर म्हणून पाहण्याचे आवाहन केले.अधिकाधिक विद्यार्थ्यांनी खेळांमध्ये सहभाग घ्यावा,असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी सुमारे ४५० विद्यार्थी व खेळाडू उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शुभांगी रोकडे (राज्य क्रीडा मार्गदर्शक) यांनी केले,तर आभार प्रदर्शन श्री.भैरवनाथ नाईकवाडी (तालुका क्रीडा अधिकारी) यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती निकिता पवार (क्रीडा कार्यकारी अधिकारी),श्री. अक्षय विरादार (क्रीडा अधिकारी),श्रीमती जान्हवी पेठे,श्री.सुरेश कळमकर आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# वडिलांच्या मृत्यूनंतर मुलांच्या शिक्षणासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचा पुढाकार

धाराशिव(जिमाका) : वडिलांच्या मृत्यूनंतर दोन अपत्यांच्या पुढील शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनलेल्या कुटुंबाला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकारामुळे दिलासा मिळाला आहे.संबंधित कुटुंबास शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने सक्रिय भूमिका बजावली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, तालुक्यातील एका खेडेगावातील एका व्यक्तीने आत्महत्या केली. त्याच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,एक मुलगी तसेच वृद्ध आई-वडील असा परिवार आहे.घरातील कर्त्या पुरुषाच्या मृत्यूनंतर कुटुंबावर मोठे संकट ओढावले असून मुलांच्या पुढील शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (बालकांसाठीची बालस्नेही विधी सेवा) योजना २०२४ अंमलबजावणीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष श्रीमती. अभिश्री देव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने एक समिती गठीत करण्यात आली आहे.या समितीमार्फत जिल्ह्यातील १८ वर्षांखालील मुले,मुली व तृतीयपंथी यांच्या हितासंदर्भातील समस्या सोडविण्यासाठी कार्य केले जाते.

हे प्रकरण समितीच्या सदस्या अॅड. अरुणा गवई यांच्या निदर्शनास येताच त्यांनी मृत व्यक्तीच्या पत्नीस आवश्यक कागदपत्रांसह सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धाराशिव यांच्याकडे मुलांच्या शिक्षणासाठी शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत विनंती अर्ज सादर केला.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,सचिव श्रीमती भाग्यश्री पाटील यांनी या अर्जाची तात्काळ दखल घेऊन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अनंत कुंभार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला व संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली.यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अनंत कुंभार यांनी संबंधित दोन्ही मुलांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्याची हमी दिली.

तसेच जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांना प्रकरणाची माहिती देण्यात आली.या प्रकरणात जातीने लक्ष देऊन दोन्ही मुलांना शासनाच्या आरटीई योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अनंत कुंभार यांनी दिले.त्यामुळे या दोन्ही मुलांच्या पुढील शिक्षणाचा मार्ग सुकर झाला आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत आर्थिक दुर्बल घटक,अनुसूचित जाती-जमाती,महिला,बालके व तृतीयपंथी यांच्या हक्कांसाठी विनामूल्य कायदेशीर मदत पुरविण्यात येते.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे आलेल्या समस्या मार्गी लावल्या जातात. त्यामुळे या घटकांतील व्यक्तींनी अडचण असल्यास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती भाग्यश्री पाटील यांनी केले आहे.

# तुळजापूर-नळदुर्ग रस्त्यावर गतिरोधक करा

## अपघाताचा धोका टाळण्यासाठी नागरिकांतून मागणी



तुळजापूर(प्रतिनिधी)-प्रतिनिधी । तुळजापूर नव्याने तयार करण्यात आलेल्या तुळजापूर-नळदुर्ग रस्त्यावर भरधाव वेगातील वाहनामुळे अपघात होत असल्याने तुळजापूर-नळदुर्ग रोडवर गतिरोध करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. विशेष म्हणजे तुळजापूर-नळदुर्ग रोडवर अनेक शाळा, महाविद्यालय तसेच खेळाचे मैदान असल्याने शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे. तुळजापूर-नळदुर्ग राज्य मार्गाचे राष्ट्रीय महामार्गात रूपांतर करण्यात आले असून, दोन पदरी रस्त्याचे नुकतेच नव्याने बांधकाम करण्यात आले आहे. भव्य आणि गुळगुळीत रस्त्यावर भरधाव वेगातील वाहना मुळे अपघाचा प्रमाणात वाढ झाली आहे. नुकताच शनिवार (दि. १३) दुपारी भरधाव वेगातील चार चाकी व दुचाकी चा अपघातात दुचाकी वरील युवक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. विशेष म्हणजे दुचाकी वरील युवक विद्यार्थी असल्याचे तसेच परीक्षेला जात असल्याचे सांगण्यात येत आहे. या पूर्वी नळदुर्ग रोड वर जागो जागी गतिरोधक होते, गतिरोधका मुळे नळदुर्ग रोड वर अपघाताचे प्रमाण नगन्य होते. नळदुर्ग रोड अनेक शैक्षणिक संस्था असल्याने विद्यार्थ्यांची नेहमी वर्दळ असते. परीणामी अपघाताचा धोका टाळण्यासाठी नळदुर्ग रोड वर जागोजागी गतिरोधक तयार करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. नळदुर्ग रोडवर शाळा, महाविद्यालय, मैदान नळदुर्ग रोडवर सैनिकी विद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय, नवोदय शाळा, आयटीआय, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय आदी शैक्षणिक संस्था आहेत. या शिवाय तालुका क्रिडा संकुल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतिगृह आदी संस्था असल्याने या रस्त्यावर विद्यार्थ्यांची नेहमी वर्दळ असते.

# अवैध मद्य विरोधी कारवाई

उमरगा पोलीस ठाणे:आरोपी नामे-विकास बाबुराव वडदरे, वय ३५ वर्षे, रा. कराळी ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.१२.१२.२०२५ रोजी १४.३० वा. सु. कराळी पाटी येथे अंदाजे ३,७५० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ७५ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# लोहाऱ्यात शिवराज पाटील चाकूरकर यांच्या आठवणींतून कार्याला उजाळा



लोहारा(प्रतिनिधी)-लोहारात काँग्रेसचे ज्येष्ठ आणि माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. रविवारी सायंकाळी ४:३० वाजता शहरातील लोक वाचनालयात आयोजित या कार्यक्रमात त्यांच्या कार्याची आठवण जागवली गेली.

प्रारंभी शिवराज पाटील चाकूरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. माजी सरपंच नागण्णा वकील, पंचायत समितीचे माजी सदस्य चंद्रकांत पाटील, काँग्रेस तालुका अध्यक्ष शामसुंदर तोरकडे, तसेच दिपक मुळे आणि बाबासाहेब जाधव यांनी त्यांच्या आठवणी सांगितल्या. लोहारावासी त्यांच्या कारकीर्दीशी परिचित असून, त्यांच्या कार्यकर्त्यांसोबत केलेल्या सहकार्यासाठी भावनिक श्रद्धांजली अर्पण केली. उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध राहून त्यांना आदरांजली वाहिली.

कार्यक्रमासाठी लोक वाचनालयाचे सचिव माणिक तिगाडे, काँग्रेस तालुका उपाध्यक्ष ईस्माईल मुल्ला, युवक काँग्रेस तालुका उपाध्यक्ष संग्राम पाटील, हरी लोखंडे, ऐनोद्दीन सवार, युवक काँग्रेस शहराध्यक्ष प्रकाश होंडराव, तसेच इतर कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगेश मिटकरी, वैभव होंडराव, चेतन होंडराव, संग्राम पाटील, समर्थ कुंभार, स्वप्निल निर्मळे, संतोष फावडे, महेश कुंभार, असिफ शेख, बसवराज पाटील यांनी पुढाकार घेतला.

# अपघातामध्ये पायांना अपंगत्व आलेल्या नागरिकास ३५ लाख रुपयांचा धनादेश



उमरगा (प्रतिनिधी)- येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि विधिज्ञ मंडळाच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी उमरगा येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोकअदालतीत एकूण ५,३८८ प्रकरणांपैकी १,३६३ प्रकरणांत तडजोड झाली, ज्यामध्ये संबंधितांना ३ कोटी २६ लाख १० हजार ८६० रुपये देण्याचे निश्चित झाले.

लोकअदालतीत चार न्यायिक पॅनलद्वारे प्रकरणे पाहण्यात आली. यामध्ये भूसंपादन ४७, कौटुंबिक ३७, धनादेश १३४, मोटार अपघात ८८, दिवाणी १०४९, फौजदारी वाद ४०, गुन्हा कबुल ६५ आणि विविध प्रकारचे प्रलंबित १५४८ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यापैकी १३८ प्रकरणांचे निकाल मिळाले. मोटार अपघात प्रकरणांत १३ प्रकरणात १,१५,९५,००००० , दिवाणी प्रकरणांत ५८ प्रकरणांत १,५९,५५,३००, गुन्हा कबुल प्रकरणांत ३८,६०० रक्कमेची तडजोड झाली. सर्व प्रकरणांत मिळून एकूण २ कोटी ७९ लाख ५० हजार ९५३ वसुल करण्यात आली.

विशेष प्रकरण क्रमांक १००/२०२२, सुर्यवर्धन विरुद्ध बालाजी, यात ३५ लाखांची तडजोड झाली. या प्रकरणातील सुर्यवर्धन दोन्ही पायांनी अपंग असून अर्जदाराच्या बाजूने ड. आर. जी. जाधव यांनी काम पाहिले. सदर प्रकरणात जिल्हा न्यायाधीश के. एफ. एम. खान यांनी निकाल दिला.

लोकअदालतीत जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीमती के. एफ. एम. खान, सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर गजेंद्र कोल्हापूरे, सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सौ जी. पी. बनकर आणि दुसरे सहदिवाणी न्यायाधीश के. एन. निवडंगे यांनी पॅनल म्हणून काम पाहिले. तसेच विधिज्ञ मंडळ, तालुका विधी सेवा समितीचे कर्मचारी आणि पंच सदस्य यांनी कामकाज हाताळले. या लोकअदालतीत प्रकरणांचे निकालीकरण व तडजोडीमुळे न्यायालयीन कार्यक्षमतेत मोठा फायदा झाल्याचे सांगितले जात आहे.


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649